


# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026
संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com




* वर्ष ६५ वे * अंक २७१ * नांदेड * रविवार, दि. ११ ऑक्टोबर २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211

# केजरीवाल, ममता बॅनर्जी, ध्रुव राठी ते अभिजीत दिपकेंसह दिल्ली पोलिसांकडून हजारो आंदोलक जेरबंद

## सरकारविरोधात विरोधी पक्षांचा संताप

**मुंबई (प्रतिनिधी)–** राज्यात एकीकडे एमपीएसस विद्यार्थ्यांचे आंदोलन सुरू असताना दुसरीकडे राजधानी दिल्लीतील जंतरमंतरवर कॉकरोच जनता पार्टीने आंदोलनाची हाक दिली आहे. त्यासाठी, संस्थापक अभिजीत दिपकेंसह सीजेपीचे पदाधिकारी दिल्लीत पोहोचले असता पोलिसांनी सर्वांना विमानातूनच ताब्यात घेतलं. मात्र, दुसरीकडे दिल्लीच्या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात जेन-झी, विद्यार्थी संघटना आणि विरोधी पक्षातील पदाधिकारीही उतरल्याचं पाहायला मिळत आहे. त्याच पार्श्वभूमीवर पोलिसांनी धरपकड सुरू केली असून बड्या नेत्यांना स्थानबद्ध केलं आहे.

### जोपर्यंत ज्ञानेश कुमारांचा राजीनामा होणार नाही, तोपर्यंत माघार नाही; सीजेपीनं रणशिंग फुंकलं

सीजेपीकडून शनिवार दिल्लीमध्ये जंतरमंतर २.० चा नारा देण्यात आला होता. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्यासाठी सीजेपीने एल्गार पुकारला आहे. मात्र आंदोलन कोणत्याही स्थितीत मोडून काढण्यासाठी आज दिल्ली पोलिसांनी पूर्णपणे बळाचा वापर केला. मुंबईतून दिल्लीकडे येत असतानाच विमानातून उतरण्यापूर्वीच दिल्ली पोलिसांनी महिला पोलिसांचं पथक घुसवून अभिजित दिपके, आशुतोष रांका आणि सौरभ दास यांना ताब्यात घेतलं. दरम्यान, अभिजित दिपके यांनी एक संदेश पोस्ट करताना सीपीआय (माले) च्या आंदोलनाची धुरा अजिंक्य शिंदे यांच्याकडे दिली आहे. अभिजित दिपके यांच्या आजीचं निधन होऊनसुद्धा त्यांच्यापर्यंत संपर्क झाला नसल्याचे अजिंक्य शिंदे यांनी म्हटलं आहे. शिंदेंनी आता जोपर्यंत ज्ञानेश कुमार यांचा राजीनामा होणार नाही, तोपर्यंत माघार नाह, असा इशारा दिला आहे.

एसआयआर रद्द करणे आणि मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेशकुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी सीजेपीने आज दिल्लीत आंदोलनाची हाक दिली होती. तर, काँग्रेससह इंडिया आघाडीच्या प्रमुख नेत्यांनीही कालच राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची भेट घेऊन ज्ञानेश कुमारांविरुद्ध निवेदन दिले आहे. त्याच, पार्श्वभूमीवर शनिवारी सीजेपीच्या आंदोलनात जेन-झीसह विद्यार्थी संघटनांचे पदाधिकारीही सहभागी झाल्याचं दिसून आलं. त्यामुळे, दिल्ली पोलिसांनी निमलष्कर दलासह पोलिसांचा फौजफाटा रस्त्यावर उतरवला असून अनेकांना ताब्यात घेण्यात आलंय.

आम आदमी पक्षाचे नेते अरविंद केजरीवाल, तृणमूल काँग्रेसच्या नेत्या ममता बॅनर्जी, युट्यूबर ध्रुव राठी ते सीजेपीचे संस्थापक अभिजीत दिपकेंसह अनेकांना दिल्ली पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. विशेष म्हणजे, मुंबईतही महात्मा गांधींचे नातू तुषार गांधी यांना मुंबई पोलिसांनी ताब्यात घेतलं असून डीएन नगर पोलीस ठाण्यात स्थानबद्ध करण्यात आलंय. आत्तापर्यंत दिल्ली पोलिसांनी १७०० हून अधिक आंदोलकांना जेरबंद केल्याची माहिती आहे. मात्र, अद्यापही आंदोलनाचा जोर वाढत असून दिल्लीत सरकारविरोधात विरोधी पक्षांचाही संताप पाहायला मिळत आहे.









दिल्ली पोलिसांच्या अभूतपूर्व नाकेबंदीनंतरही दिल्लीसह देशभरात ज्ञानेशकुमारांविरोधात वणवा पेटल्याचे चित्र दिसून आले. आंदोलनात जेन झी, राजकीय पक्ष, सामाजिक संघटना, विद्यार्थी संघटना, वकील संघटनांचा सहभाग दिसून आले. मुंबई, पुणे, नाशिकमध्येही नागरिक रस्त्यावर उतरल्याचे दिसून आलं. त्यामुळे जंतरमंतरवर आंदोलकांना पोहोचता आलं नसलं, तरी जिथं पोलिसांनी थांबवण्याचा प्रयत्न केला तिथंच जंतरमंतर झाल्याचे दिसून आले. दुसरीकडे, सीजेपीने सकाळी १० वाजता जंतर मंतरवर आंदोलनाचे आवाहन केले होते. समर्थकांनी तिथे पोहोचण्याचा प्रयत्न केला, परंतु अनेक ठिकाणी लावलेल्या तीन ते पाच थरांच्या बॅरिकेड्समुळे त्यांना पुढे जाण्यापासून रोखण्यात आले.

राष्ट्रीय राजधानी क्षेत्रातील अभूतपूर्व सुरक्षा कारवाईदरम्यान, जंतर मंतर येथील कॉकरोच जनता पार्टीच्या नियोजित आंदोलनाचे नेतृत्व राष्ट्रीय संघटन प्रभारी अजिंक्य शिंदे करत आहेत. आयजीएल विमानतळावर विमान उतरताच संस्थापक अभिजीत दिपके आणि आयोजक सौरव दास व आशुतोष रांका यांना दिल्ली पोलिसांनी विमानातूनच ताब्यात घेतल्यानंतर या आंदोलनाची धुरा अजिंक्य शिंदेंकडे आली.

केंद्र आणि राज्य सरकारांकडून आंदोलनांवर घालण्यात आलेल्या निर्बंधांचा बॉम्बे लॉयर्स असोसिएशनकडून निषेध करण्यात आला आहे. आंदोलनांवर ज्या पद्धतीने निर्बंध लादले जात आहेत, त्यावरून सरकारने 'अघोषित आणीबाणी' लागू केल्याची टिप्पणी असोसिएशनने केली आहे.

# नांदेडमध्ये आज नाना पाटेकर यांना कृतज्ञता सभेद्वारे श्रद्धांजली

**नांदेड (प्रतिनिधी)–** ज्येष्ठ अभिनेते तथा 'नाम'चे संस्थापक नाना पाटेकर यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी त्याचबरोबर नांदेड जिल्ह्याच्यावतीने त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी सभेचे आयोजन करण्यात आले आहे. रविवार, दिनांक ११ ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारी एक वाजता दैनिक 'गोदातीर समाचार' कार्यालय, शिवाजीनगर, नांदेड येथे ही श्रद्धांजली सभा होणार आहे.



दिवंगत नाना पाटेकर यांनी २०१५ पासून नांदेड जिल्ह्यातील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांसाठी केलेल्या भरीव काम/मदतीबद्दल त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी, त्याचबरोबर त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी ही सभा होत आहे. या सभेस सर्वांनी उपस्थित राहावे असे आवाहन करण्यात आले आहे.

# घटस्थापनेने आजपासून नवरात्रोत्सवाला प्रारंभ; दुष्काळाच्या छायेतही आदिशक्तीच्या आराधनेचा उत्साह

## माहूर येथील रेणुकामातेच्या दर्शनासाठी भाविकांची गर्दी

**नांदेड (प्रतिनिधी)–** आदिशक्तीच्या उपासनेचा आणि स्त्रीशक्तीच्या जागराचा मंगल पर्व असलेल्या नवरात्रोत्सवाला आज, घटस्थापनेने प्रारंभ होत आहे. यंदा जिल्ह्यावर दुष्काळाची छाया असली तरी श्रद्धा, भक्ती आणि परंपरेचा उत्साह कायम असून, नऊ दिवस देवीच्या विविध रूपांची आराधना करण्यासाठी भाविक सज्ज झाले आहेत. घराघरांत तसेच सार्वजनिक मंडळांमध्ये विधिवत घटस्थापना करून नवरात्रोत्सवाची सुरुवात केली जाणार आहे.

नवरात्राच्या पहिल्या दिवशी घटस्थापनेला विशेष धार्मिक महत्त्व आहे. कलशाची स्थापना करून त्यामध्ये देवीचे आवाहन केले जाते. पुढील नऊ दिवस देवीच्या विविध रूपांची पूजा, आरती, अभिषेक आणि धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. अनेक महिला व युवती नऊ दिवस उपवास, उपासना आणि व्रत-परंपरेचे पालन करतात. शहरातील विविध भागांत आकर्षक देवीच्या मूर्ती, फुलांची सजावट आणि विद्युत रोषणाईने भक्तिमय वातावरण निर्माण होणार आहे.

नवरात्रोत्सवाचे आणखी एक आकर्षण म्हणजे गरबा आणि दांडिया. पारंपरिक वेशभूषेत महिला, युवती आणि युवक गरबा- दांडियाच्या तालावर नृत्याविष्कार सादर करतात. धार्मिक श्रद्धेसोबतच सामाजिक आणि सांस्कृतिक एकोप्याचे दर्शन घडविणारा हा उत्सव तरुणाईमध्ये विशेष लोकप्रिय आहे.

नांदेड जिल्ह्यातील माहूरगडावरील श्री रेणुका देवीचे नवरात्र विशेष महत्त्वाचे मानले जाते. नऊ दिवस येथे विविध धार्मिक विधी, पूजा-अर्चा आणि दर्शनासाठी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून भाविक दाखल होतात. त्यामुळे माहूर परिसराला यात्रेचे स्वरूप प्राप्त होते.




**आजपासून नवरात्र महोत्सवाला प्रारंभ होत असून आई दुर्गा देवीच्या मुर्त्यांनी बाजारपेठ सजली आहे. (छाया : करणसिंह बैस)**

# पनामात भूकंपाचा महाप्रलय! ७.७ तीव्रतेच्या धक्क्यानंतर ९ देशांना त्सुनामीचा हाय अलर्ट

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** मध्य अमेरिकेतील पनामा देशाच्या किनारपट्टीवर शुक्रवारी रात्री एक अत्यंत भयानक नैसर्गिक आपत्ती ओढवली. रिश्टर स्केलवर ७.७ इतकी प्रचंड तीव्रता नोंदवलेला एक महाभयंकर भूकंप भूगर्भात झाला. या अज्ञानातून आणि तीव्र धक्क्यानंतर संपूर्ण अमेरिका खंडात खळबळ उडाली आहे. अमेरिकेच्या दूतावासाने तात्काळ पावले उचलत मध्य आणि दक्षिण अमेरिकेतील तब्बल नऊ देशांसाठी त्सुनामीचा मोठा इशारा जारी केला आहे, ज्यामुळे किनारपट्टीवरील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

राष्ट्रीय भूकंप विज्ञान केंद्राने सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'एक्स'वर दिलेल्या माहितीनुसार, हा शक्तिशाली भूकंप ९ ऑक्टोबर रोजी रात्री ११ वाजून २६ मिनिटांनी (भारतीय वेळेनुसार) झाला. या भूकंपाचे केंद्र जमिनीखाली अगदी १० किलोमीटर एवढ्या कमी खोलीवर होते, ज्यामुळे त्याचे हादरे अधिक तीव्रतेने जाणवले.

# उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते १ नोव्हेंबर रोजी वाडी येथे उपजिल्हा रूग्णालयाचे उद्घाटन

**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड उत्तर विधानसभा मतदारसंघातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी आणि मूलभूत विकासकामांना गती देण्यासाठी रविवार, दि. १ नोव्हेंबर २०२६ रोजी विविध लोकोपयोगी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमांत राज्याचे उपमुख्यमंत्री तथा शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथभाई शिंदे यांच्या हस्ते विविध विकास कामांचेही उद्घाटन करण्यात येणार आहे. यात वाडी बुद्रुक येथील शंभर खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयाचा समावेश असल्याची माहिती नांदेड उत्तरचे आमदार बालाजीराव कल्याणकर यांनी दिली आहे.

नांदेड जिल्ह्यात यंदा दुष्काळी परिस्थितीमुळे शेतकरी मोठ्या संकटात सापडला आहे. अशा परिस्थितीत शेतकरी बांधवांना शेती उपयोगी साहित्य वाटपाचा कार्यक्रम हा केवळ मदत नसून त्यांना पुन्हा उभे राहण्यासाठीचे बळ देणारा ठरणार आहे. शासन आपल्या पाठीशी आहे, हा विश्वास निर्माण करणे हाच यामागील मुख्य उद्देश आहे.





तसेच या दिवशी वाडी (बु.) येथील १०० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयाचे उद्घाटन होणार आहे. या रुग्णालयामुळे नांदेड उत्तरसह परिसरातील ग्रामीण भागातील गोरगरीब रुग्णांना दर्जेदार आरोग्य सेवा मिळणार असून हा निर्णय समाजहिताच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आहे. तसेच मतदारसंघातील विविध रस्त्यांचे उद्घाटन आणि नांदेड शहरातील नव्या रस्त्यांचे भूमिपूजनही याच दिवशी होणार आहे. चांगले रस्ते म्हणजे विकासाचा कणा असतो.

याच दिवशी महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक एकचे नगरसेवक सुहास कल्याणकर यांच्या जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन आणि पक्षप्रवेश सोहळाही आयोजित करण्यात आला आहे. यामुळे पक्ष संघटन अधिक मजबूत होऊन जनतेच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी नवी ऊर्जा मिळणार आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ भाई शिंदे हे आपल्या व्यस्त वेळापत्रकातून वेळ काढून या सर्व कार्यक्रमांना प्रमुख उपस्थिती लावणार असल्याचे सांगण्यात आले.

सदर कार्यक्रमाची वेळ उपमुख्यमंत्र्यांच्या सोयीनुसार निश्चित केली जाणार असून प्रशासनाकडून जय्यत तयारी सुरू करण्यात आली आहे.

# दिल्लीतील मेट्रो का रोखल्या? आज सुनावणी

**नव दिल्ली (प्रतिनिधी)–** दिल्ली प्रशासनाने आंदोलने रोखण्यासाठी केलेल्या उपाययोजनांना आव्हान देणाऱ्या याचिकांवर सर्वोच्च न्यायालय आज सुनावणी घेणार आहे. न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची आणि व्ही. मोहना यांचे खंडपीठ या प्रकरणाची सुनावणी करेल. याचिकांमध्ये असा आरोप करण्यात आला आहे की, न्यायालयाच्या आदेशानंतरही मेट्रो स्थानके आणि रस्ते वाहतूक विस्कळीत झाली होती. कॉकरोच जनता पार्टीच्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर १० ऑक्टोबर रोजी दिल्ली मेट्रो आणि भारतीय रेल्वेच्या गाड्यांची वाहतूक पूर्णपणे थांबवू नये, या न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन झाल्याचा आरोप करणारी एक याचिका शनिवारी सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आली.

# महात्मा गांधींचे पणतू तुषार गांधी मुंबई पोलिसांच्या ताब्यात

## संजय राऊत, आदित्य ठाकरे पोलीस स्टेशन बाहेर

**मुंबई (प्रतिनिधी)–** निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमारांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी देशभरात आंदोलनाला सुरुवात झाली आहे. दिल्लीत जंतर मंतर वर कॉकरोच जनता पार्टीचे आंदोलन सुरु होण्या आधीच अभिजित दिपके आणि त्यांच्या साथीदारांना दिल्ली पोलिसांनी ताब्यात घेतले.

तसेच विरोधी पक्षाच्या नेत्यांनाही ताब्यात घेण्यात आले. अश्यातच आज सकाळीच मुंबई पोलिसांनी सामाजिक कार्यकर्ते तुषार गांधी यांना ताब्यात घेतले. यावरून आता शिवसेना ठाकरे गट चांगलाच आक्रमक झाल्याचे पाहायला मिळत आहे.

महात्मा गांधी यांचे पणतू तुषार गांधी यांना अंधेरी पश्चिम येथील डी. एन. नगर पोलीस ठाण्यात ठेवण्यात आलं आहे. या घटनेनंतर शिवसेना (ठाकरे गट) आक्रमक झाली असून, युवासेना प्रमुख आदित्य ठाकरे यांनी पोलीस ठाण्यात धाव घेतली आहे.

तुषार गांधी यांना ताब्यात घेतल्याच्या घटनेनंतर आदित्य ठाकरे यांनी पोलिसांसोबत चर्चा केली. जोपर्यंत तुषार गांधी यांना सोडलं जात नाही, तोपर्यंत आपण पोलीस ठाण्यातून बाहेर जाणार नाही, अशी भूमिका त्यांनी मांडल्याची माहिती आहे.




# महाटीच्या वाळूघाटावर उमाप यांच्या पथकाचा छापा; वाळू, ५ हायवा, ६ जेसीबीसह ४ कोटींचा मुद्देमाल जप्त

## दहा जणांवर गुन्हा दाखल

**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड परिक्षेत्रातील अवैध व्यवसायांना आळा घालण्यासाठी पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांच्या विशेष पथकाने नांदेड, परभणी आणि लातूर या तिन्ही जिल्ह्यांत धडाकेबाज कारवाया करत २० इसमांविरुद्ध कारवाई केली असून ४ कोटी २३ लाख ७५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

नांदेड जिल्ह्यात अवैध वाळू उपसा व वाहतुकीच्या तक्रारी प्राप्त झाल्यानंतर पथकाला मुदखेड हद्दीतील महाटी शिवारात पाठविण्यात आले. रात्री ११ वाजता वाळू धक्क्यावर छापा टाकला असता इंजिन बोटीच्या सहाय्याने नदीपात्रातून वाळू उपसा करून फायबर बोटीने किनाऱ्यावर आणली जात असल्याचे निदर्शनास आले. यावेळी पोलिसांनी शिवराज संभाजी ढगे, तुळशीराम श्यामराव हनुमंते, सदाशिव गोणेवाड, बळी दत्तराम ढगे, गुलाब जाधव, परमेश्वर जाधव, अवधूत गोविंदराव ढगे, उद्धव राजू जाधव, ज्ञानेश्वर आनंदराव जाधव आणि गजानन राजू जाधव यांच्याविरुद्ध मुदखेड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

या कारवाईत ५ हायवा, १ टिप्पर, ६ जेसीबी मशीन आणि नदीपात्रातून काढून ठेवलेली ६५ ब्रास वाळू असा एकूण ४ कोटी १३ लाख २५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी १० इसमांविरुद्ध मुदखेड पोलीस ठाण्यात गु.र.नं. १९२/२०२६ कलम ३०३(२), ३(५) बीएनएस व कलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.





### परभणीत मटका अड्ड्यावर छापा

दि. ९ ऑक्टोबर रोजी गंगाखेड पोलीस ठाणे हद्दीत राधिका लॉज व विजयप्रभा बार शेजारील पत्र्याच्या दोन शटरमध्ये सुरू असलेल्या मटका बुकींवर पथकाने कारवाई केली. येथून २१ हजार ६०० रुपयांची रोख रक्कम आणि ७१ हजार रुपये किमतीचे ८ मोबाईल असा एकूण ९२ लाख ६०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी ९ इसमांविरुद्ध गंगाखेड पोलीस ठाण्यात गु.र.नं. ६६५/२०२६ कलम १२(अ) महाराष्ट्र जुगार कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### लातूरमध्ये गुटखा जप्त

दि. १० ऑक्टोबर रोजी लातूर जिल्ह्यातील अहमदपूर हद्दीत काळेगाव मदरशाजवळ टोयोटा इटिओस कारमधून विक्रीसाठी नेत असलेला ४ लाख ५७ हजार ५०० रुपयांचा गुटखा आणि कार असा एकूण ९ लाख ५७ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी माधव मोरे (रा. जांब, ता. मुखेड, जि. नांदेड) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

ही कारवाई पोलीस उपनिरीक्षक पंकज इंगळे, पोलीस हवालदार प्रदीप खानसोळे, गणेश राठोड, संदीप वाघाडे व गजानन डवरे यांनी केली असून, डीआयजी शहाजी उमाप यांनी पथकाचे अभिनंदन केले आहे.

# नवरात्रोत्सवाचा संदेश



नवरात्र दरवर्षी येतो. नवदिवस रेलचेल असते. नव दिवसानंतर तो निघून जातो. येतो तसा. परंतु तो का येतो? हे मात्र कोणीही जाणत नाही.

नवरात्री उत्सवाची एक कथा प्रचलीत आहे. म्हटलं जातं की, नऊ दिवस एक देवी वेगवेगळं रूप घेऊन महिषासूर नावाच्या दैत्याशी लढली. ती नऊ दिवस व नऊ रात्र लढली. म्हणूनच या उत्सवाला नवरात्र उत्सव म्हणतात व या उत्सवापासून आपण बोध न घेता फक्त हा उत्सव साजरा करताना केवळ या उत्सवाकडे एक मनोरंजन म्हणून आपण पाहतो व आपलं मनोरंजन करुन घेत हा उत्सव साजरा करतो. ज्यात सजून-धजून पाषाणरुपातील देवीचं दर्शन घेण्यासाठी मंदिरात जातो. कोणी सजून-धजून गरबा खेळायला जातात आणि ऐन परीक्षेच्या वेळेस असे गरबा खेळायला जावून आपल्या आयुष्याचं वाटोळं करुन घेतात.

महिषासूर...महिषासूराला त्या काळात देवीनं दहाव्या दिवशी मारलं, वेगवेगळी रुपं घेवून. परंतु खरंच महिषासूर मरण पावला का? त्याचा पुनर्जन्म झाला नसेल काय? त्याच्या रक्तातून महिषासूराची दंपत्ती तयार झाली नसेल काय? होय. महिषासूर मरण पावला. नवदुर्गांनी मारलं महिषासूराला दहाव्या दिवशी. परंतु तो संपला नाही. त्यानं तद्नंतर जन्म घेतलाय, पुनर्जन्म. त्यानंतर त्यानं शांत राहून अनेक महिषासूरांना जन्माला घातलंय. माराल तरी एक महिषासूर मरेल. आणखी कितीतरी महिषासूर तयार होतील. हाच संदेश देत. तसंच आजचं चित्र दिसत आहे.

आजची महिला ही अंतराळात गेली. ती पंतप्रधान बनली. राष्ट्रपती बनली. परंतु सक्षम झाली का? नाही. दोन-चार महिला सुधरल्यानं व त्यांचा विकास झाल्यानं त्यांचा विकास झाला असा त्याचा अर्थ होत नाही. बऱ्याचशा महिला या अशाही आहेत की, ज्या उच्च शिक्षण शिकतात. उच्च पदावर जातात. मोठमोठी पदं भूषवतात. परंतु तरीही स्वतःचे निर्णय स्वतः घेऊ शकत नाहीत. त्या आपल्या घरात आपल्या पतीच्याच विचारावर अवलंबून असतात. त्यांच्या निर्णयापलीकडे जात नाहीत. त्यांच्याच मतानं चालतात, वागतात. तसंच त्या आपलं अस्तित्वही विसरतात की मीही सक्षम आहे. मीच दुर्गा, जंगदंबा, काली, शैलपुत्री व चंद्रघंटा आहे. जर तिनं आपण सक्षम आहो, असं मानून घरात व्यवहार करण्याचा प्रयत्न केला तर तिला घरातून हाकलून लावलं जातं. कारण तिथं तिचा पती रुपातील स्वतःला परमेश्वर मानणारा महिषासूर घरी लपलेला असतो. जर त्या महिलेनं पत्नी समजून आपलं दुर्गारुप घरात दाखविण्याचा प्रयत्न केला की हा आजच्या काळातील महिषासूर तिचं चालूच देत नाही. कारण आजच्या काळातील महिषासूर हा सुधारित आहे व कालच्या काळातील महिषासूरापेक्षा कितीतरी जास्त प्रमाणात बुद्धी व ताकत त्यांच्यात आज आलेली आहे. काल दहाव्या दिवशी मरण पावलेल्या महिषासूराने त्यापासून बोध घेतलेला आहे व तो आता नव्या रुपानं पुनर्जन्म घेऊन अवतरलेला आहे. कधीही न मरण्यासाठी. अमर होवून आलेला आहे तो. आपल्या वंशजांच्या रुपात. म्हणतोय की, तुम्ही कितीही देव्या बना. मी आपला करिश्मा दाखविणारच.

एक पुरुष हा जगाचा आधारस्तंभ आणि एक महिला ही सृष्टीची आधारस्तंभ. असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही. कारण महिला आहे म्हणूनच सृष्टी आणि हे जगही आहे.

नुकतीच नवरात्र महोत्सवाला सुरुवात झालेली आहे व या नवरात्र महोत्सवात स्त्रियांना देवीच्या रुपात अतिशय मानाचं स्थान आहे. या काळात महिलांना एका कन्येरुपात पुजलं जात असून, आम्ही महिलांविषयी किती जागरूक आहोत, याचाही परिचय दिला जात आहे.

महिला ही सृष्टीची आधारस्तंभच. कारण तीच ज्या बाळाला जन्म देते. त्याचं संगोपन करुन त्याला लहानाचा मोठा करते अन् असं करीत असताना ती कधीच कंटाळा करीत नाही. मग त्या बाळाला कडेवर घेणं असो. त्या बाळाचा अभ्यास घेणं असो वा इतर सर्व प्रकारच्या बाळाविषयक जबाबदाऱ्या. ती कधीच अशा जबाबदाऱ्या टाळत नाही. जे बाळ मोठं झालं की, तेच बाळ नवनवीन शोध लावतं व सृष्टीत आपल्या ज्ञानानं भर टाकत असतं. ज्यामुळं महिलेला सृष्टीचा आधारस्तंभही म्हटलेलं आहे. जे काम एक महिला करते. तेच काम एक पुरुष करीत नाही. बाहेर नोकरी करायला जाणारी महिला, घरी आल्यावरही घरातील बरीचशी कामं करते. तेवढी कामं एक पुरुष करीत नाही. एका महिलेनं जन्माला घातलेलं तिचं अपत्य सृष्टी रक्षणाचं कामंही करतं. नव्हे तर तिही सृष्टी रक्षणाचं काम करीत होती. हे शिकवतो आपल्याला आपला इतिहास. देव्या त्या काळात होत्या की नव्हत्या. हे काही माहीत नाही. परंतु जो नवरात्र उत्सव आज साजरा केल्या जातो. त्यावरुन कळतं की जसा पुरुष त्या काळात सक्षम होता. त्यापेक्षा कितीतरी प्रमाणात महिलाही सक्षम होत्या. जो नवरात्र उत्सव दरवर्षी येवून महिलांना संदेश देत असतो की महिलांनो, तुम्ही सक्षम बना.

महिला आज सक्षम आहे काय? असा प्रश्न उपस्थित केल्यास त्याचं उत्तर मिळतं, नाही. आजही महिला सक्षम नाही. जरी त्या महिलेत कालची दुर्गा, काली, शैलपुत्री, चंद्रघंटा, जगदंबा संचारत असेल तरी. तरी ती आजच्या काळातील महिषासूराची महिषासूर मर्दिनी बनून शिकार करीत नाही.

महिषासूर...काल एकच महिषासूर होता जगात. जो महिषासूर सृष्टीवर राज करायचा. जो महिषासूर महिलांना छळायचा. जो महिषासूर महिलांच्या इज्जतीवर हात घालायचा. तेच पाहिलं सर्वांनी व त्याचं दमन करण्यासाठी कितीतरी महिला एकत्र झाल्या व त्यांनी एकत्र येवून त्या काळातील एका महिषासूराचं दमन केलं, दुर्गा नावाचा अवतार घेवून. हेच नवरात्र महोत्सव शिकवतं व आठवण करुन देतं, दरवर्षी की तुम्हीही असंच करावं. आजच्या काळात कोणालाही महिषासूर बनू देवू नका. परंतु हे जरी खरं असलं तरी आजच्या काळात महिषासूर नाहीत का?

महिषासूराबद्दल आज विचार करीत असताना आजच्या काळातही महिषासूर भरपूर आहेत व आजच्या काळात असे महिषासूर भरपूर आहेत. जे महिषासूर महिलेला एकटं बघतात व तिच्यावर अतिप्रसंग करण्याचे प्रसंग करतात. तिचे चेहरे अप्रूप, विद्रुप करून प्रसंगी तिला जाळूनही टाकतात. आजचे महिषासूर घरातही आहेत की, जे आपल्याच घरातील दुर्गास्वरुप लक्ष्मीला हुंड्यासाठी छळतात व तिलाही जाळून टाकतात. कधी विष देतात तर कधी फासावर लटकावून तिनंच फाशी घेतलेली आहे. असा बनाव करतात. एवढंच नाही तर अशा महिषासूराला शिक्षा न देता त्याला मदत करणारी न्यायव्यवस्था पुरावे व्यवस्थित न तपासता पटकन जमानत देते. ज्यातून आजच्या काळातील महिषासूराची शक्ती वाढते. ज्या न्यायालयाच्या जमानत नावाच्या शक्तीनं त्याला एवढं बळ मिळतं की तो नव दिवसच नाही तर बरेच दिवस जीवंत राहतो, कधीही मरत नसल्यासारखं गृहीत धरून.

आजचे महिषासूर तर नवरात्रदरम्यानच्या उत्सवातही हजर असतात. नवरात्र उत्सवादरम्यान गरबा खेळायला येणाऱ्या व सजून-धजून येणाऱ्या सुंदर सुंदर मुलींना आपल्या जाळ्यात ओढतात. प्रेमाचं नाटक करुन प्रेमजाळं फेकतात व सहज अशा कोवळ्या कौमार्य अवस्थेतील मुलींना प्रेमजाळ्यानं नवरात्र महोत्सवातूनच आकर्षीत करुन ओढून घेतात. मग काय, अशा मुली प्रेमजाळ्यात फसल्या की बस, आयुष्य बरबाद. शिक्षणात मन लागत नाही. सारखी त्यानंतर महिषासूराचीच आठवण. परंतु हे महिषासूर अशा मुलींशी विवाहबद्ध होत नाहीत. ते फक्त आपली हवस पूर्ण करतात व हवस पूर्ण झाली की सोडून देतात. त्यानंतर अशा मुलींना आजच्या महिषासूरानं सोडल्यावर त्या गरोदर राहतात. दिवस जास्त झालेले असतात आणि महिषासूराचा पत्ता नसतो. शेवटी गर्भधारणेला जास्त दिवस झाले की भ्रूणहत्या करता येत नाही. मग नाजायज बाळ जन्माला घालावं लागतं व बदनामी नको म्हणून बाळ रस्त्यावर फेकलं जातं. ज्या आपल्या पोटातून काढलेल्या बाळाला जीवंत असताना कुत्रं खावो की आणखी कोणी. याचा विचारच केल्या जात नाही. मात्र महिषासूर सुटतो, पुढील वाईट कर्म करण्यासाठी.

आजच्या काळातील महिलांनी नव-रात्रोत्सव साजरा करताना हीच गोष्ट लक्षात घ्यावी. नवरात्रोत्सवापासून संदेश घ्यावा व नवरात्रोत्सव नक्कीच साजरा करावा. सजावं, धजावं. गरबा खेळावा. परंतु कोणाच्या प्रेमजाळात अडकू नये. प्रेमभावनेच्या गोड गोड बोलण्यात अडकू नये. त्या प्रेमाच्या गोंडस पडद्यात लपलेल्या महिषासूराला ओळखावे. शिवाय नवरात्र संपल्यावरही महिषासूर संपले. असं गृहीत धरु नये. ते असतातच आजुबाजूला, आपण वावरत असताना. अशावेळेस त्यांचा प्रतिकार करण्यासाठी चौकस बुद्धी ठेवावी आपल्याजवळ. तिखटाची एखादी पुड ठेवावी आपल्याजवळ. नाहीच असली तर धुळ घ्यावी. तिलाच शस्त्र बनवावं. कारण माती ही देखील महत्त्वपूर्णच आहे. तिच्यापासून दुर्गेची मूर्ती बनते. कधी आजूबाजूच्या दगडांना शस्त्र बनवावं. अन् तेही नसेल तर हाता पायालाच शस्त्र बनवून त्यानं प्रतिकार करावा. जेणेकरुन आजच्या काळातील हे मोकाट सुटलेले व लावारीस झालेले, अत्याचार, अन्याय करु पाहणारे महिषासूर संपतील. यात शंका नाही. एवढाच संदेश नवरात्रोत्सवाच्या निमित्याने देणे आहे.

**-अंकुश शिंगाडे**
नागपूर
मो. ९३७३३५९४५०

# राजा भिमसेनची नगरी...

**वऱ्हाडी कथा**

एक गाव होत. गावाच नाव सांगळूद. अकोला जिल्ह्याच्या पूर्व दिशेनं चार फर्लांगावर वसलेलं हे गाव. बैलाचा बझार म्हतल की सांगळूद हे नाव लोकायच्या तोंडावर ये.या गावात दोन जिगरी मैतर होते.सुभ्या अन् मन्या. दोघही सोबत खेळत. शायेत जात. तेयचे घर भितीले भित लागून होते. जस काय जुय फय.

सुभ्याचा आबा रोज राती थ्या दोघायले गोष्टी सांगे. दोघही बाजीवर झोपून आबाच्या गोष्टी आयकत आयकत झोपी जात असत. तेयनं कवाच पुरी गोठ आयकली नोती. का की कथा लंबीलचक असे.

ईतवार गुजरीतला बझाराचा दिस होता. दोघही पोट्टे भातक खावून जानकीराम बुढ्याजौळ आले.

'आबा आमाले एखांदी कथा सांगा ना.

मन्या बुढ्याले म्हणाला.

अबे सायाचेहो पयले भाकर टुकळा खा मंग या कथा आयकाले. तसे तुमी पुरी कथा कवा आयकता बे फोकनीचे हो.

बुढा यल्लावत लेकरायले बोलत होता.

आबा सांगा ना हो नयी एखांदी कथा.

सुभ्या बोलला.

अबे अज ईतवार हायना बे लेका. त्वाल्या बापानं मटनं गिटन आनलं असन ना. पयले सन्नावून जीवून घ्या अन मंग या कथा आयकाले.

मा आता करून राह्यली वाटघाट. अन् मटन ठुयल चुलीवर शिजाले. लय वाळकूळचं शिजू राह्यलं लैय टायम हाय भाजी बनाले.

बरं बापा तुमी येवळे हट्टी पेटलेच त सांगतो. गोठ आयका त. झोपू नका. अनं हु ऽऽ हुं ऽऽ करत जा. नाहीत बात डोया लागते तुमचा.

हव आबा सांगा गोठ आयकतो आमी.'

मन्या बोलला.

आयका त. एक होती सोननगरी. ह्या नगराचा राजा होता भिमसेन. अवघी नगरी त्याची सोन्याची होती. बायायच्या आंगावर ईतक सोनं असे की त्या पिव्व्याधम्म हयदी सारख्या दिसत जश्या काय नागीनं. गावातले लोकं इतके श्रीरीमंत होते की कोनाले मोलम जुरी कराले जा च काम पळत नोत. लेकरू तोंडात सोन्याचा चम्चाच घेऊन जल्माले येत असे. अस खुसम खुम गाव होत. राजा राती आपला बाना बदलवून निघे. तो रोज भिकारीचा रूप घेऊन निघे.नगरीतले लोक कसे आहेत ख्यालीखुशालीत हायेत का नाहीत म्हणून तो चाचपनी करे. कोनाच्याही दारात गेल की तो खाली हात ना ये. लोक त्याले भाकर भाजी देत. गावातले




लोक मयाळू हायेत अस त्याले मनोमन वाटे.तो भाकर भाजी झोईत जमा करून पाखरायले टाके. अशाच एका राती राजा महलातून गावात शिरला. कोनीतरी नवखा मानूस त्याले झाळाच्या आळोंगी दिसला. राजा त्याच्या जौळ गेला. त्याले ईचारल.

कोन हायेस रे बावा तू.

तो चोर होता. तो जरा टरकला घायबरला. चोर राजाले म्हणाला.. तू कोन हायेस थे मले अगूदर सांग.

मी नाचूकला एक भिकारी हाय ब्वा. जे भेटन थे खातो अन् जिथा आसरा भेटन तीथ निजतो. त्वाल घर कुठ्सा हाय. अन् त्वाल नाव काय हाय.

हे अभाय म्हनजे माह्य छप्पर अन् माती म्हणजे माह्य आंगन. पाय नेतीन तिकळे भटकतो. मले कोनीच नाही.माह्यवालं नाव गयबाऱ्या हाय.

अबे पन म्या आयकल की ह्या गावात एकही भिकारी नाही. मंग तू आला तरी कुठून.

चंदनाच्य् झाळात एखांदी बाभूयी ही ऊगवत असते ना ब्वा. तसा मी हाय. बरे थे जावू द्या तुमी कोन हा. ईतल्या राती कुठ चाल्ले. तुम्हाले त या नगरीत म्या कवाच पाह्यलं नाही.

मी चोर हाव. माह्य नाव भिकाजी गोंड हाय. म्या आयकल की ह्या नगरीत सारे लोक शीरीमंत हाय. हे सोन्याची नगरी हाय. अथिसा चोरी कराले आलो मी. आपन दोघ मिळून चोरी करू अन् हे गाव लूटून अन् सोळून जावू दूर कुठतरी अन् शिरिमंत होवू.

राजा उगाच आव आनून...

मले कस जमन बापा चोरी. म्या त कवा बाप जल्मात कोनाची काळीची चोरी केली नाही.

सारं ज्यमते ना बे गयबाऱ्या तू फकस्त माह्या संग राह्य अन् गंमत पाह्य.'

तुमच्या संग राह्यतो खरी पन् मले अर्धा हिस्सा द्या लागन.

हव देतो.

चल थ्या घरात जावू. दोघही एका घरात शिरतात. घरातले लोकं ढारमंढूर निजलेले असतात. शनिशिंगनापूर गावा सारखे सारे लोक निचंत असतात. घराचे दारं थे सताळ ऊघळे ठेवतात. कारण ह्या नगरीत कवाच चोरी होत नसे.भिकाजी घरात शिरते. राजा दाराजौळ ऊबा राह्यते. तिजोरीत असलेलं सार सोन भिकाजी गाठोळ्यात बांधते अन् विजयी मुद्रेनं बाहेर येते.

चल लेका पटकन झाल आपल काम.

दोघही जंगलात येतात. एक भल्यामोठ्या पिपयाच्या झाळाच्या ढोलित सोन ठुयतात. ऊल्स सोनं घेतात. दुस-या दिवशी सोनाराजौळ जावून ईकतात. साजरे कपळे, वायना घेतात. गावात एकच बोंब ऊठते. चोरी झाली म्हनून ज्याच्या घरी चोरी होते थो ऊकिरडा राजाच्या दरबारात जाते पन् राजा शिकारीले जंगलात गेल्याच कयते. ऊकिरडा नाराज होऊन घरी जाते. भिकाजी दर दोन रोजान गावात चोरी करू असा ईचार गयबाऱ्या जौळ बोलून दाखवते. गयबाऱ्या होकार भरते.रात झाली की थे चोरी कराले निंघतात चोरी केलेला म ाल पिपयाच्या ढोलित नेवून ठुयतात. मयना भर चोरी केल्यावर भिकाजी ठरोते. आता बस झालं. आता गाव सोळून दूर कुठ तरी चाल्ल जावू असा ईचार ऊकिरड्याले बोलून दावते. ऊकिरडा होकार भरते. आज आपली शेवटली अन आखरीची चोरी हाय मंग आपण दूर कुठतरी सार सोनं घेवून जावू. भिकाजी म्हनते.

पन् कुठ जाच. जिकळे पाय नेतीन तिकळे जावू. तुले कोनी ना मले कोनी.

दोघही शेवटच्या तयारीले लागतात. कायीभोर रात होते चांदनचूटूक पळल असते.चंद्र अभायात लपाछुपीचा खेय कायबे-या अभायात लपून खेयत होता. नगरी शांत झाली होती. भिकाजी अन् ऊकिरडा गावात शिरले. आता नगरीतले

हरेक घराचे दारं बंद होते. पन् राजा घळीभ-यातच गायब झाला. भिकाजी थ्याले अंधारात हलक्या अवाजात ... ऊकिरड्या कुठ हायेस बे. दिसून नाही राह्यला तू. असा अवाज देत होता. घळीभ-यातच राजान त्याचा बाना लेयला.अन् भिकाले पकळलं. नगारे वाजवल्या गेले.गाव चेती झालं. रातीच सभा भरली. गयबाऱ्याले राजाच्या बाऱ्यात अन् सिंहासनावर बसुन पाहून भिका गोंड डोयत बसला. भिमसेन राजान फर्मान सोळलं. चार शिपाई जा अन् जंगातल्या मारोतीच्या देवळाजौळ पिपयाच झाळ हाय. थ्या झाळाच्या ढोलितून सारं सोन काहाळूनं आना. भालेदारी चार शिपाई लगेच जंगलाच्या दिशेन रवाना झाले. सोन आनल गेलं. जेयच्या घरच सोन चोरीले गेल तेयले तेयच सोननानं देल्ल गेलं. राजा मास्किल हासत भिकाजी कळे पाह्यत होता. काय मंग भिकाजीराव गोंड. काय म्हनन हाय तुमच.

राजेश्री मले माफ करा.मी कवाच चोरी नाही करणार. मले माफ करा. राजा गालात हासत म्हणाला. भिकाजी तुले तशी फाशीची शिक्षा देल्ली असती पन् त्वाला स्वभाव मले आवळला. तरी शिक्षा त्वालि कमी करून तुले मरेपर्यंत कारागृहात रहावे लागेल. अशी सजा आईकताच भिकाजीचे डोये पाना-वले. सा-या गावानं सुटकेचा निःश्वास टाकला.

सुभ्या अन् मन्या घोरत निझले होते. जानकीराम बुढा पोट्याले म्हनू लागला. झोपले काय बे पोट्टे हो. ईना जेवताच निझले वाट्टे मायबयीन पोट्टे.

आमची गोठ सरो अन् तुमच्च पोट शिगोर भरो. अस बोलून बुढा न्हानीत जाते.

**-सु. पुं. अढाऊकर**
अकोला
मो. ९७६९२०२५९७

## मोडला तो खोपा सुगरणीचा विणलेला...

सोडून गेला बाप
का अवेळी आम्हाला?
मोडला तो खोपा
सुगरणीचा विणलेला

उजाड रान सारे
देह हा शिणलेला
हरवून गेला तेव्हा
गंध श्वासात जपलेला

माय उदास एकली
ऊभी उंब-यात
कसे लागेल तिचे मन
तुमच्याविना घरात?

दृष्ट लागली कोणाची
संसार होता साजरा
कसा आवरावा एकटीने
विस्कटलेला पसारा?

नातं शोधते आजोबाला
पुन्हा पुन्हा घरात
लाड करणारा आजोबा
राहीला फक्त स्मरणात

**-रुपाली वागरे/वैद्य**
नांदेड
मो. ९८६०२७६२४१

## न्यायासाठी लढ...

भोगावे लागते । येथे सारे भोग ।
सुख,दुःख, रोग । याचसाठी ।।
करता सत्कर्म । आनंद मिळेल ।
संकट टळेल । मार्गातील ।।
देतो तेच पुन्हा । मिळते परत ।
म्हणून सतत । कर्म कर ।।
माणुसकीविना । सारे धर्म व्यर्थ ।
टाळण्या अनर्थ । निट वाग ।।
पाषाण बनून । अन्याय पाहणे ।
अन्याय करणे । सम जाण ।।
न्यायासाठी लढ । न्यायासाठी जग ।
संकटाचे ढग । दूर कर ।।
जन्माला आलेला । नक्कीच मरेल ।
सत्कर्म उरेल । तुझे वेड्या ।।
दयाभाव तुझ्या । अंतरी जागव ।
गोविंद माधव । माणसात ।।
अजु सत्य बोल । सत्य धर्म जाण ।
गुप्त कर दान । जिवनात ।।

**-अजय रमेश चव्हाण,**
तरनोळी, ता.दारव्हा, जि. यवतमाळ
मो.८८०५८३६२०७

# 'बेमिसाल' बिगबीचा जन्मदिन महानायकाला शुभेच्छा!

११ ऑक्टोबरला शतकातील महानायक अशी ओळख असणारे आणि पडद्यावरील आपल्या झंझावाती कारकिर्दीमुळे देश-विदेशातील चित्रपट रसिकांच्या गळ्यातील ताईत बनलेले बीग बी अर्थात बॉलिवूडचे 'शहेनशहा' अमिताभ बच्चन ८५ व्या वर्षात पदार्पण करीत आहेत. अँग्री यंग मॅन पासून ते सरकारच्या विविध योजनांचे ब्रँड ॲम्बेसिडर म्हणून केलेल्या जाहिरातीतील त्यांची अनेक रूपे भारतीयांनी पाहिली आहेत. 'अमिताभ' या शब्दातच अशी जादू आहे की, तरुणपणी मिळालेल्या लोकप्रियतेला उतारवयातही उतरती कळा लागू शकली नाही. आजही रसिकांवर त्यांनी केलेलं गारुड टिकून आहे.

काही वर्षांपूर्वी (२०१९) त्यांना सिनेसृष्टीतील सर्वात मोठा बहुमान समजला जाणारा दादासाहेब फाळके पुरस्कार प्रदान झाला, तेव्हा इंडस्ट्री आणि चाहत्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते. त्यानंतरच्या वर्षी (२०२०) त्यांनी अवयव दान करण्याचा निर्णय जाहीर केला आहे. त्यांचा हा निर्णय म्हणजे एका महान आणि पवित्र कार्यातील सक्रिय सहभाग असून अत्यंत प्रशंसनीय आणि अनुकरणीय आहे. विविध अवयवांच्या प्राप्तीसाठी कितीतरी गरजू जीव नवजीवनाच्या प्रतीक्षेत आहेत. अवयव दाना संदर्भात हळूहळू जनते-मध्ये सकारात्मकता दिसत असली तरी ते प्रमाण वाढले पाहिजे. अमिताभ सारख्या सेलिब्रिटींनी यामध्ये सहभाग घेतल्याने ही चळवळ गतिमान होऊ शकते.

### कारकिर्दीचा आढावा

१९६९ साली 'सात हिंदुस्तानी' या चित्रपटातून बॉलिवूडमध्ये पदार्पण करणाऱ्या बीग बी यांनी अनेक हिट चित्रपट दिले. १९७३ मध्ये आलेल्या 'जंजीर' या सिनेमामुळे त्यांची कारकीर्द उजळून निघाली आणि हिंदी सिनेसृष्टीला त्यांच्या रूपाने एक अँग्री यंग मॅन मिळाला. दीवार, शोले, कभी कभी, डॉन, शक्ती,



शहेनशाह, अग्निपथ या चित्रपटातील विजय हे त्यांनी साकारलेले पात्र हिंदी सिनेसृष्टीतला मैलाचा दगड ठरले. २००० नंतर बागबान, कभी खुशी कभी गम, ब्लॅक, पा, पीकू, १०२ नॉट आऊट, उंचाई, गुडबाय, आणि २०२४ मधील ब्लॉकबस्टर 'कल्की २८९८' मधील अश्वत्थामा या भूमिकेपर्यंत त्यांनी विविधांगी भूमिका साकारल्या आहेत. लवकरच ते 'कल्की' च्या सिक्केलमध्येही दिसणार आहेत.

### सध्या चर्चेत केबीसीचा १८ वा सीझन

आज वयाच्या ८३ व्या वर्षीही ते कामात प्रचंड व्यस्त आहेत. सध्या ते सोनी एंटरटेनमेंट टेलिव्हिजन आणि सोनी लिव्ह वरील 'कौन बनेगा करोडपती' चा १८ वा सीझन अत्यंत यशस्वीरित्या होस्ट करीत आहेत. यंदाच्या सीझनची थीम आहे 'सोचना पडेगा'. माहिती सहज उपलब्ध असणाऱ्या या युगात फक्त उत्तर माहीत असणे नव्हे, तर विचार करून, समजून घेऊन निर्णय घेण्याच्या क्षमतेचा गौरव हा सीझन करतो आहे. अगदी १ ऑक्टोबर २०२६ रोजी केबीसी १८ च्या शूटिंग दरम्यान पाय घसरून त्यांच्या डाव्या गुडघ्याला किरकोळ दुखापत झाली, तरीही खुर्चीवर बसून त्यांनी आपले मान्सून-ओपनिंग सुरू ठेवले. काम सुरूच राहील असा दिलासा त्यांनी चाहत्यांना दिला. काही दिवसांपूर्वी रिटायर होण्याच्या अफवांवरही त्यांनी मिश्किल शैलीत खुलासा केला मी कामातून रिटायर होत नाहीये, रात्री झोपण्यासाठी रिटायर होतोय, असे त्यांनी ब्लॉगमध्ये लिहिले.

मोठ्या पडद्याबरोबरच छोट्या पडद्यावरही त्यांचे सूत्रसंचालन प्रचंड लोकप्रिय आहे. सोशल मीडियावर कायम सक्रिय असणारे अमिताभ अनेकदा वडील हरिवंशराय बच्चन यांच्या कवितांच्या ओळी चाहत्यांसोबत शेअर करत असतात. गेल्या पाच दशकांहून अधिक काळ प्रेक्षकांचे अविरत मनोरंजन करणाऱ्या या बेमिसाल महानायकाला जन्म दिनाच्या हार्दिक शुभेच्छा. त्यांना दीर्घायुष्य लाभो, ही ईश्वरचरणी प्रार्थना.

**-प्रा. विजय कोष्टी,**
कवठेमहांकाळ, जि. सांगली

# चारा साक्षरतेतून चारा टंचाईवर मात करा

## सोमठाणा येथे शेतकरी व पशुपालकांना शास्त्रीय चारा व्यवस्थापनाचे मार्गदर्शन

**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थिती आणि संभाव्य चारा टंचाई लक्षात घेता उपलब्ध चाऱ्याचा कार्यक्षम वापर करून पशुधनाला सकस व पौष्टिक आहार उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हाभर 'चारा साक्षरता अभियान' राबविण्यात येत आहे. जिल्हाधिकारी आणि मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्या संकल्पनेतून राबविण्यात येणाऱ्या या अभियानांतर्गत भोकर तालुक्यातील सोमठाणा येथे शेतकरी व पशुपालकांसाठी चारा व्यवस्थापन आणि पशुपोषणविषयक जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

दुष्काळी परिस्थितीत हिरव्या चाऱ्याची उपलब्धता कमी झाल्यास ज्वारीचा कडबा, गव्हाचे काड आणि अन्य कोरड्या चाऱ्याचा वापर वाढतो. अशा चाऱ्याची पाचकता व पोषणमूल्य तुलनेने कमी असल्याने पशुधनाच्या आरोग्यावर आणि दूध उत्पादनावर परिणाम होऊ शकतो. यावर उपाय म्हणून योग्य कोरड्या चाऱ्यावर युरिया-मोलासेस



प्रक्रिया करण्याच्या तंत्रज्ञानाची माहिती शेतकरी व पशुपालकांना देण्यात आली. या प्रक्रियेमुळे चाऱ्याची पाचकता सुधारण्यास आणि मोलासेसच्या वापरामुळे रुचकरता वाढण्यास मदत होते. ही प्रक्रिया तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली योग्य प्रमाणात व सुरक्षित पद्धतीने करणे आवश्यक असल्याचेही स्पष्ट करण्यात आले.

चारा उत्पादनासाठी जमीन आणि पाण्याची उपलब्धता मर्यादित असताना कमी जागेत नियंत्रित पाणीवापरातून अंकुरित हिरवा चारा तयार करण्यासाठी हायड्रोपोनिक्स तंत्रज्ञान उपयुक्त ठरू शकते. या तंत्रज्ञानाची माहिती देताना हा चारा संतुलित पशुआहाराचा पुरक घटक असल्याचे सांगण्यात आले. हिरवा चारा, वाळलेला चारा, संतुलित पशुखाद्य आणि खनिज मिश्रण यांचा जनावरांच्या गरजेनुसार योग्य समतोल राखण्याचे आवाहन करण्यात आले.

उपलब्ध चाऱ्याचा जास्तीत जास्त उपयोग करण्यासाठी कडबाकुट्टी यंत्राचा वापर, हिरव्या चाऱ्यापासून मुरघास निर्मिती, कोरड्या चाऱ्याची योग्य साठवणूक आणि पशुधनाच्या गरजेनुसार संतुलित आहाराचे नियोजन याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. केवळ चारा उत्पादन वाढविणे पुरेसे नसून उपलब्ध चाऱ्याचे पोषणमूल्य वाढविणे, त्याची नासाडी टाळणे आणि साठवणुकीचे योग्य नियोजन करणेही तितकेच महत्त्वाचे असल्याचे सांगण्यात आले.

या कार्यक्रमास जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय डॉ. सखाराम खुणे, सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय डॉ. प्रवीणकुमार घुले, पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. अविनाश बुन्नावार, डॉ. दीक्षाली मोरे, डॉ. उमेश सोनटक्के तसेच पशुधन पर्यवेक्षक केदार देशमुख, रविकुमार बबिलवाड आणि विजय विभुते उपस्थित होते.

जिल्ह्यातील प्रत्येक गावापर्यंत चारा साक्षरता अभियान पोहोचवून शेतकरी व पशुपालकांना आधुनिक, शास्त्रीय आणि किफायतशीर चारा व्यवस्थापन तंत्रज्ञानाची माहिती देण्यावर भर देण्यात येत आहे. उपलब्ध चाऱ्याचा कार्यक्षम वापर, योग्य साठवणूक आणि संतुलित पशुआहाराच्या माध्यमातून दुष्काळी परिस्थितीत पशुधनाचे आरोग्य व उत्पादनक्षमता टिकविण्याचे आवाहन या कार्यक्रमातून करण्यात आले.

## अनधिकृत वीज वापरणाऱ्या विरुद्ध महावितरणची कारवाई

**नांदेड (प्रतिनिधी)–** ग्राहकांना अखंडित आणि सुरळीत वीज पुरवठा करता यावा यासाठी महावितरणकडून ग्रामीणसह शहरी भागात अनधिकृत वीज वापरकर्त्यांविरुध्द धडक कारवाई करण्यात येत आहे.

ग्रामीण भागात वीज वाहिन्यावर आकडे टाकणे, मोठ्या प्रमाणात वीज वापर करणारे शेगड्या हिटरसारखे अनधिकृत उपकरणे वापरण्यामुळे वाहिन्या व रोहित्रे अतिभारीत होत असल्याने विद्युत यंत्रणा हतबल होत आहे. परिणामी, प्रामाणिक ग्राहकांचा यंत्रणेविरुध्द असंतोष वाढत असल्याने महावितरणकडून अनधिकृत वीज वापरकर्त्यांविरुध्द धडक मोहीम हाती घेण्यात आली आहे. नांदेड, भोकर, देगलूर, परभणी, हिंगोली, सेलू विभागातील सर्व ग्रामीण आणि शहरी भागात ही कारवाई करण्यात येत आहे. परिमंडलात हजारो वीज वापरकर्त्यांकडून शेगड्या-हिटर्स जप्त करण्यात आल्या आहेत.

शेतशिवारातही आकडे आणि अनधिकृत वीज वापरकर्त्यांविरुध्द कारवाई करुन कृषीपंपांना कॅपॅसिटर लावणे, वैध मार्गानेच वीज वापरास भाग पाडणे, रात्रीच्या वेळी वीज वाहिन्यावरील लोड तीस अंपिअरच्या खाली राखून सुरळीत वीजपुरवठा होण्यास सहकार्य करण्याचे आवाहन क्षेत्रीय अभियंत्याकडून करण्यात येत आहे.

# अर्धापुरात छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिरात प्रमाणपत्र वाटप

**अर्धापूर (प्रतिनिधी)–** शासनाच्या सेवा संकल्प अभियान २०२६ अंतर्गत तहसील कार्यालय अर्धापूर येथे पुनम पाटील उपविभागीय अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली व तहसीलदार रेणुकादास देवणीकर यांच्या मार्गदर्शनाखाली छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबीर नुकतेच पार पडले. या शिबिरात प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले.

या शिबिराच्या माध्यमातून नागरिकांना विविध शासकीय विभागांच्या सेवा एकाच छताखाली उपलब्ध करून देण्यात आल्या. त्यामुळे नागरिकांना शासकीय कामांसाठी विविध कार्यालयांमध्ये जाण्याची आवश्यकता कमी होऊन एकाच ठिकाणी सेवा मिळण्यास मदत झाली. शिबीराच्या अध्यक्षा उपविभागीय अधिकारी पुनम पाटील, तहसीलदार रेणूकादास देवणीकर,तालुका आरोग्य अधिकारी सुनील दासरे, तालुका कृषी अधिकारी विशाल बि-हाडे, साहायक पोलीस निरीक्षक भास्कर कांबळे, नायब तहसीलदार राजेश शिंदे, वनपाल एस.आर.कवळे, सामाजिक वनीकरण एस. डी. बक्षी, डी. डी. बारेला, बी. जी. शिंदे, एच. बी. सुरवसे, एस. आर कांबळे, एस. आर.कन्ना, एस. पी. नंद आदींची प्रमुख उपस्थिती होती.

या शिबिरामध्ये महसूल विभागासह




पंचायत समिती, नगरपंचायत, भूमी अभिलेख, कृषी, आरोग्य, पशुसंवर्धन, महावितरण, पुरवठा, नोंदणी व मुद्रांक, महिला व बालविकास, शिक्षण आदी विभागांचे स्टॉल उभारण्यात आले होते. शिबिरात प्रलंबित फेरफार नोंदींचा निपटारा, सातबारा व आठ-अ उतारे, स्वामित्व सनद, विविध महसूल प्रमाणपत्रे, विवाह नोंदणी, शिधापत्रिका, मालमत्ता हस्तांतरण, घरगुती वीज जोडणी, जन्म-मृत्यू प्रमाणपत्र, व महिला शेतकऱ्यांसाठी आवश्यक प्रमाणपत्रे तसेच इतर शासकीय योजनांशी संबंधित सेवांचा लाभ नागरिकांना देण्यात आला.

सद्यस्थितीत पाणी टंचाई व चारा टंचाईच्या अनुषंगाने आवश्यक त्या उपाययोजना करण्याबाबत व जलतारा संधारण बाबत मार्गदर्शन केले तसेच शासनाच्या विविध लोककल्याणकारी योजनांची माहिती देऊन पात्र लाभार्थ्यांनी योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन उपविभागीय अधिकारी व तहसीलदार यांच्या वतीने करण्यात आले. या शिबिरास तालुक्यातील सर्व विभागांचे विभाग प्रमुख उपस्थित होते.

शासकीय सेवा अधिक सुलभ, पारदर्शक व लोकाभिमुख करण्याच्या दृष्टीने सेवा संकल्प अभियान महत्त्वपूर्ण ठरत आहे. यावेळी विविध विभागांचे स्टॉल लावून नागरिकांच्या समस्या सोडविण्यात आल्या व विविध प्रमाणपत्रे देण्यात आली. या शिबिराच्या यशस्वीतेसाठी उपविभागीय अभियंता पंकज देशमुख, सुनील देवकांबळे, पशुसंवर्धन अधिकारी डॉ. दिलीप उदगीरे, उपकृषी अधिकारी जी. पी वाघोळे, नायब तहसीलदार सूर्यकांत ताडेवाड, विस्तार अधिकारी पांडुरंग गर्जे, एस. पी. गोखले, मंडळ अधिकारी राजू इंगळे, नवीन रेड्डी, रामदास दुधाटे, तलाठी बी. के. वसमतकर, किरण मोरे, उज्ज्वला वानखेडे, रवी पल्लेवाडे, तलाठी घुगे, सुरेश पत्रे, संतोष गाडे, शिवकुमार देशमुख, शिक्षण विभागाचे शेख, के. पी. खानसोळे आदी कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# संशोधनाला नवी दिशा: आविष्कारमध्ये इंदिरा कॉलेज ऑफ फार्मसीचे यश




**नांदेड (प्रतिनिधी)–** सहायोग सेवाभावी संस्थेच्या इंदिरा कॉलेज ऑफ फार्मसी विष्णुपुरी, नांदेड येथील विद्यार्थ्यांनी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या वतीने आयोजित आविष्कार जिल्हास्तरीय संशोधन स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करत महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. विविध विद्याशाखांमध्ये विद्यार्थ्यांनी प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक पटकावत संशोधन, नाविन्यपूर्ण विचार आणि सर्जनशीलतेची प्रभावी छाप उमटवली.

आविष्कार संशोधन स्पर्धेत विविध विद्या शाखांतील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. इंदिरा कॉलेज ऑफ फार्मसीच्या विद्यार्थ्यांनी आपल्या संशोधन प्रकल्पांचे प्रभावी सादरीकरण करून उत्कृष्ट यश संपादन केले.

मेडिसिन अँड फार्मसी पदवी या गटात आदित्य मुदिराज यांनी प्रथम क्रमांक पटकावला. ह्युमॅनिटीज, लँग्वेजेस अँड फाइन आर्ट्स पदव्युत्तर या गटात शीतल वाघमारे यांनी प्रथम क्रमांक मिळवला. इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी पदव्युत्तर या गटात पवन पिंटो यांनी प्रथम क्रमांक मिळवत महाविद्यालयाच्या यशात भर घातली. याशिवाय दुर्गा राऊत यांनी द्वितीय क्रमांक, तर वर्षा गाजूला, बियाबानी फातेमा आणि आस्था गाजरालवार यांनी तृतीय क्रमांक मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले.

विद्यार्थ्यांच्या या यशामागे त्यांची अथक मेहनत, संशोधनाची आवड, नाविन्यपूर्ण विचारसरणी आणि मार्गदर्शक प्राध्यापकांचे मोलाचे मार्गदर्शन आहे. या विद्यार्थ्यांना डॉ. पल्लवी कांबळे व मिस हाजेरा खान यांनी मार्गदर्शन केले. त्यांच्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांना संशोधन प्रकल्प अधिक प्रभावीपणे मांडण्यास आणि अविष्कारच्या व्यासपीठावर उत्कृष्ट कामगिरी करण्यास प्रेरणा मिळाली.

# महिला पतंजली योग समितीकडून हदगावमध्ये तीन दिवसीय योग शिबीर उत्साहात

**हदगाव (प्रतिनिधी)–** महिला पतंजली योग समिती, हदगावच्या वतीने तालुका प्रभारी गायत्री पद्मावार यांच्या पुढाकारातून आयोजित करण्यात आलेले तीन दिवसीय 'रोगानुसार योग प्राणायाम शिबीर' उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले. ममता नगर रोड येथे ६ ते ८ ऑक्टोबरदरम्यान झालेल्या या शिबिराला योगसाधक व महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या शिबिरात मोटापा, वात-पित्त-कफ तसेच कॅन्सर यांसारख्या विषयांवर योग व प्राणायामाच्या माध्यमातून मार्गदर्शन करण्यात आले.

नांदेड येथील पतंजली योग समितीच्या राज्य कार्यकारिणी सदस्या नंदिनीताई चौधरी, योग शिक्षिका सुरेखा घोगरे तसेच आणिताताई यांनी उपस्थितांना विविध योगासने, प्राणायाम व निरोगी जीवनशैलीबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. कार्यक्रमास ब्रह्मकुमारी



सेंटर, हदगावच्या प्रतिनिधींसह नगराध्यक्षा रोहिणी वानखेडे, डॉ. कदम, डॉ. मामीडवार, सुमित्रा जगताप तसेच संपूर्ण योगसाधक, ममता नगरमधील योगसाधक महिला तसेच आर्य वैश्य महासभेच्या महिला उपस्थित होत्या.

शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी गायत्री पद्मावार यांनी विशेष परिश्रम घेतले. त्यांच्या नियोजनातून आणि सर्व योगसाधकांच्या सहकार्यामुळे तीनही दिवसांचा कार्यक्रम शिस्तबद्ध व उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. या उपक्रमाची नोंद हरिद्वार येथे होणार असून, शिबिराच्या यशाची पावती स्वामीजींकडून लवकरच मिळणार असल्याचे आयोजकांकडून सांगण्यात आले. शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी मार्गदर्शक, योग शिक्षिका, प्रमुख पाहुणे, योगसाधक तसेच सहकार्य करणाऱ्या सर्व महिला व नागरिकांचे गायत्री पद्मावार यांनी मनःपूर्वक आभार मानले.

## नवरात्रीसाठी चार गाड्यांना मैहर स्थानकावर तात्पुरता थांबा

**नांदेड (प्रतिनिधी)–** नवरात्रोत्सवानिमित्त मैहर येथे होणाऱ्या नवरात्री मेळ्यासाठी देशभरातून मोठ्या संख्येने भाविक येण्याची शक्यता आहे. भाविकांची गर्दी लक्षात घेऊन पश्चिम मध्य रेल्वेने मैहर स्थानकावर काही गाड्यांना तात्पुरता थांबा देण्याचा निर्णय घेतला आहे.

दि. ११ ऑक्टोबर ते २२ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत खालील गाड्यांना त्यांच्या संबंधित तारखांना मैहर स्थानकावर तात्पुरता थांबा देण्यात येणार आहे. गाडी क्र. ११०४५ कोल्हापूर - धनबाद एक्सप्रेस (साप्ताहिक) दि. १६ आक्टोबर २०२६ रोजी मैहर येथे वेळ - १७:२० ते १७:२५ गाडी क्र. १७६१० पूर्णा - पटना एक्सप्रेस (साप्ताहिक) दि. १५ आक्टोबर २०२६ रोजी मैहर येथे वेळ - १०:४० ते १०:४५ गाडी क्र. ११०४६ धनबाद - कोल्हापूर एक्सप्रेस (साप्ताहिक) दि. १२ आक्टोबर २०२६ आणि १९ आक्टोबर २०२६ रोजी मैहर येथे वेळ - २२:२५ ते २२:३० गाडी क्र. १७६०९ पटना - पूर्णा एक्सप्रेस (साप्ताहिक) दि. १७ आक्टोबर २०२६ रोजी मैहर येथे वेळ - १७:१५ ते १७:२०

प्रवाशांनी गर्दीच्या काळात रेल्वे प्रशासनाला सहकार्य करावे, सुरक्षा नियमांचे पालन करावे आणि स्वच्छता राखावी, असेही आवाहन दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागाने केले आहे.

## तरोडा भागातील बेलानगर येथील अंगणवाडीमध्ये आरंभ उपक्रमाचा कार्यक्रम उत्साहात साजरा



**नांदेड (प्रतिनिधी)–** आरंभ सुरुवातीचे क्षण मोलाचे. खेळ हवा, खेळणी नको, नुकताच बाल विकास प्रकल्प कार्यालय नांदेड शहर यांच्यावतीने तरोडा खुर्द बीटमधील बेलानगर येथे आरंभ उपक्रमांअंतर्गत पालक मेळावा उत्साहात पार पडला.

महात्मा गांधी आयुर्विज्ञान संस्था सेवाग्राम व युनिसेफ यांच्या संयुक्त विद्यमाने शून्य ते तीन वर्षे वयोगटातील बालकांसाठी अंगणवाड्यांमधून आरंभ हा उपक्रम राबवला जातो. पालक मेळाव्यामध्ये तुम्ही तुमच्या बालकाशी बोलता का?, संवेदनशील पालकत्व, बोगदा, बाहुली घर, कापडी बॉल, मला खाऊ नका, मेंदूचे जाळे यासारख्या बालकांच्या विकासाशी निगडित असणाऱ्या उपक्रमांचे स्टॉल लावण्यात आले होते. विभागातील पालकांनी बालकांसोबत स्टॉलला भेट देऊन व प्रत्यक्ष कृती करून सहभाग नोंदवला. या पालक मेळाव्याला पालकांनी भरभरून प्रतिसाद दिला

# नारीशक्तीचा जागर स्वावलंबनातून सक्षमीकरणाकडे -प्रा. डॉ. मेघा पाठक

**नांदेड (प्रतिनिधी)–** प्रतिभा निकेतन महाविद्यालयात आयोजित प्रतिभा व्याख्यानमालेच्या २७ व्या पुष्पात 'नारीशक्तीचा जागर : स्वावलंबनातून सक्षमीकरणाकडे' या विषयावर प्रा. डॉ. मेघा पाठक, राज्यशास्त्र विभाग, प्रतिभा निकेतन महाविद्यालय यांनी विचारमंथन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. किशोर गंगाखेडकर होते.

नारीशक्ती हा केवळ महिलांपुरता मर्यादित विषय नसून ती एक व्यापक सामाजिक संकल्पना आहे, असे प्रतिपादन प्रा. डॉ. मेघा पाठक यांनी केले.

आपल्या व्याख्यानात त्यांनी नारीच्या भूतकाळापासून वर्तमानकाळापर्यंतच्या प्रवासाचा विविध अंगांनी वेध घेतला. 'स्वावलंबन ही सक्षमीकरणाची




पहिली पायरी आहे' असे स्पष्ट करत त्यांनी आर्थिक स्वावलंबन, निर्णयक्षमता आणि नेतृत्वगुण यांचे महत्त्व अधोरेखित केले. स्थानिक स्वराज्य संस्थांमधील महिलांच्या सहभागाचा संदर्भ देताना महिला केवळ सही करणारी सरपंच असावी की निर्णय घेणारी सरपंच?, तसेच आरक्षणाची खुर्ची की नेतृत्वाची संधी? असे प्रश्न उपस्थित करून त्यांनी महिलांच्या प्रत्यक्ष सहभागाची गरज स्पष्ट केली. ग्रामविकासाच्या संदर्भात गाव बदलायचे असेल तर ग्रामसभा बदलली पाहिजे, असे सांगत ग्रामसभेतील महिलांचा सक्रिय सहभाग, पारदर्शकता आणि निर्णयप्रक्रियेत प्रभावी सहभाग यांची आवश्यकता त्यांनी स्पष्ट केली. बचत गटांच्या माध्यमातून महिलांनी बचतीपासून व्यवसायाकडे आणि व्यवसायातून उद्योजकतेकडे वाटचाल करण्याचे आवाहनही त्यांनी केले.

घराचा अर्थसंकल्प प्रभावीपणे सांभाळणारी महिला ही कुटुंबाची अर्थमंत्रीच असल्याचे सांगत त्यांनी गृहव्यवस्थापनातील नेतृत्व आणि निर्णयक्षमतेचे मूल्य अधोरेखित केले. 'चुलीपासून चॅटबॉटपर्यंत' या प्रवासाचा उल्लेख करताना आधुनिक तंत्रज्ञानामुळे महिलांसमोर निर्माण झालेल्या नव्या संधी आणि आव्हानांवर त्यांनी भाष्य केले. मोबाईल हातात आला म्हणजे केवळ साधन नव्हे, तर संधीही आली; मात्र त्यासोबत जबाबदारी आणि सुरक्षिततेचे भानही आवश्यक आहे, असे त्यांनी सांगितले.

# गोदावरी बँकिंग कॉलेजच्या विद्यार्थ्यांची एसबीआयमध्ये निवड



**नांदेड (प्रतिनिधी)–** गोदावरी बी. कॉम. बँकिंग कॉलेजच्या पहिल्या बॅचमधील विद्यार्थ्यांनी पदवी पूर्ण करताच रोजगाराच्या क्षेत्रात दमदार पाऊल ठेवले आहे. कॉलेजचे विद्यार्थी रोहन शेंडगे व वैभव फुलझाडे यांची एसबीआय लाईफमध्ये सेल्स ऑफिसर म्हणून निवड झाली आहे. विशेष म्हणजे, नियमितपणे महाविद्यालयात उपस्थित राहणाऱ्या विद्यार्थ्यांना शिक्षणासोबतच रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्याची हमी महाविद्यालयाने दिली होती. त्यानुसार विद्यार्थ्यांसाठी सातत्याने कॅम्पस मुलाखतींचे आयोजन करण्यात येत आहे.

गोदावरी बी.कॉम. बँकिंग कॉलेजची सुरुवात सुमारे तीन वर्षांपूर्वी झाली असून, यावर्षी कॉलेजची पहिली बॅच पदवी घेऊन बाहेर पडली आहे. विद्यार्थ्यांना बँकिंग, वित्तीय सेवा आणि सहकार क्षेत्रातील प्रत्यक्ष कामाचा अनुभव मिळावा, तसेच शिक्षण पूर्ण होताच रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात, या उद्देशाने महाविद्यालयाच्या वतीने आतापर्यंत चार वेळा कॅम्पस मुलाखती घेण्यात आल्या आहेत.

या कॅम्पस निवड प्रक्रियेत एस. बी.आय. सोबतच सुधन गोल्ड लोन, गोदावरी अर्बनसह विविध संस्थामध्ये विद्यार्थ्यांची रोजगारासाठी निवड झाली आहे.

## बेलदारच्या तालुकाध्यक्षपदी शरद बुरपल्ले तर सचिवपदी लक्ष्मण वडमिले



**नांदेड (प्रतिनिधी)–** बेलदार समाज विकास संस्थेच्या नांदेड तालुकाध्यक्षपदी शरद मारोतराव बुरपल्ले, उपाध्यक्षपदी सौ. मीनाक्षी विनायक सगर तर सचिवपदी लक्ष्मण किशनराव वडमिले यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.

निळा रोड अनिल लॉन्स येथे बेलदार समाज विकास संस्थेचे अध्यक्ष राम आचेमवाड यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेऊन बेलदार समाजाची तालुका कार्यकारिणी निवडण्यात आली. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून समाजरत्न कोंडीबा बुरपल्ले, संस्थेचे सचिव आत्माराम वग्गावाड यांची प्रमुख उपस्थिती होती.

# स्वच्छता ही सेवा उपक्रमांतर्गत महाविद्यालय परिसरात स्वच्छता



**नांदेड (प्रतिनिधी)–** जवाहरलाल नेहरू समाजकार्य महाविद्यालय व संशोधन केंद्र सिडको, नांदेड येथे महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाद्वारे स्वच्छता ही सेवा उपक्रमांतर्गत महात्मा गांधी जयंतीनिमित्त स्वच्छ महाविद्यालय परिसर व श्रमदान करण्यात आले.

श्री सेवादास शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष डॉ. नानासाहेब जाधव यांच्या प्रेरणेतून व संस्थेचे कोषाध्यक्ष ॲड. श्रीनिवास जाधव यांच्या मार्गदर्शनात तसेच प्राचार्य डॉ. नरहरी पाटील यांच्या देखरेखीत समाजकार्य महाविद्यालय येथे सोमवार, दि. ५ ऑक्टोबर रोजी श्रमदान व महाविद्यालय परिसर स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

या उपक्रमात रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. व्ही. एस. रेड्डी, महाविद्यालयातील विद्यार्थी तसेच शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. श्रमदान व परिसर स्वच्छतेत राष्ट्रीय सेवा योजना कक्षाच्या वतीने श्रमदानाचे व स्वच्छतेचे महत्त्व याबद्दल प्रा. डॉ. दिलीप काठोडे तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. विद्याधर रेड्डी यांनी उपस्थित विद्यार्थी व कर्मचारी यांना स्वच्छतेचे आणि श्रमदानाचे महत्त्व लक्षात आणून दिले. नंतर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी मानवी साखळी तयार करून श्रमदान केले आणि महाविद्यालय परिसरात स्वच्छता करण्यात आली.

कार्यक्रमास महाविद्यालयाचे डॉ. एम. ए. कपूर, डॉ. एम. ए. मांजरमकर, डॉ. ए. ए. शेख, डॉ. ए. एन. कर्डीले, डॉ. पी. पी. लोखंडे, प्रा. एस. व्ही. राठोड, डॉ. एस. एस. शिंदे, डॉ. एस. डी. वरगंटे, प्रा. एस.एस. गोईनवाड, प्रा. जी.एच. बडगिरे, संतोष मोरे, राजेश्वर पाळेकर, नरेंद्र राठोड, सुनील कंधारकर, मोहन स्वामी, गणेश तेलंग, रफिक शेख, राजीव केंद्रे, अजय सुताडे उपस्थित होते.

## एमपीएससी विद्यार्थ्यांच्या मागण्यांवर तातडीने निर्णय घ्या; खा. रविंद्र चव्हाण यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

**नांदेड (प्रतिनिधी)–** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षांमधील अनिश्चितता, वारंवार होणारे बदल आणि भरती प्रक्रियेतील विलंबामुळे विद्यार्थ्यांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली असून, त्यांच्या मागण्यांवर तातडीने सकारात्मक निर्णय घेण्यात यावा, अशी मागणी खासदार रविंद्र वसंतराव चव्हाण यांनी मुख्यमंत्री महोदयांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

राज्यातील हजारो विद्यार्थी अनेक वर्षांपासून वेळ, पैसा आणि महत्त्वाची वर्षे खर्च करून एमपीएससी परीक्षेची तयारी करीत आहेत. मात्र परीक्षेच्या पद्धतीतील बदल, प्रश्नपत्रिका, अभ्यासक्रमातील अचानक बदल आणि निकालातील विलंबामुळे त्यांच्या भवितव्यावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांनी पुकारलेल्या आंदोलनाची शासनाने गंभीर दखल घ्यावी, असे निवेदनात म्हटले आहे.

खा. चव्हाण यांनी मांडलेल्या प्रमुख मागण्या अशा- पारदर्शकता: एमपीएससी परीक्षेच्या संपूर्ण प्रक्रियेत पारदर्शकता आणि विश्वासार्हता निर्माण करण्यासाठी ठोस व कालबद्ध उपाययोजना कराव्यात. प्रश्नपत्रिका, परीक्षेची पद्धत किंवा अभ्यासक्रमात बदल केल्यास विद्यार्थ्यांना पुरेसा वेळ देऊन पूर्वसूचना व स्पष्ट माहिती द्यावी.

एमपीएससीच्या विद्यमान व माजी पदाधिकाऱ्यांच्या कामकाजाची आणि परीक्षेशी संबंधित तक्रारींची चौकशी करून निष्कर्ष सार्वजनिक करावेत.

परीक्षा, जाहिराती, उत्तरतालिका, निकाल आणि मूल्यांकन प्रक्रियेचे निश्चित वेळापत्रक जाहीर करून त्याची काटेकोर अंमलबजावणी करावी, रिक्त पदांचा आराखडा: आगामी तीन वर्षांतील उपलब्ध व अपेक्षित रिक्त पदांचा आराखडा तयार करून भरतीचे नियोजन वेळेत जाहीर करावे, आदी मागण्या केल्या आहेत.

# आगामी दुर्गा महोत्सव शांततेत साजरे करा -पोनि. अशोक जाधव

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** आगामी दुर्गा उत्सव शांततेत साजरा करण्यासाठी पोलीस प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन पोलीस निरीक्षक अशोक जाधव यांनी आयोजित आगामी दुर्गा महोत्सव मंडळ निमित्ताने शांतता समितीच्या बैठकीत केले. यावेळी दुर्गा महोत्सवामध्ये महिला व युवती यांना संरक्षण देण्यात येणार असल्याचे सांगितले.

आगामी दुर्गा नवरात्र महोत्सव निमित्ताने ग्रामीण पोलीस स्टेशन येथे शांतता समिती, सार्वजनिक दुर्गा मंडळ पदाधिकारी, पोलीस पाटील, सामाजिक कार्यकर्ते, पदाधिकारी यांची बैठक ८ सप्टेंबर रोजी पोलीस निरीक्षक अशोक जाधव यांच्या उपस्थितीत पार पडली. यावेळी आगामी दुर्गा महोत्सव मंडळासंदर्भात सुचना देण्यात आल्या.

यावेळी प्रास्ताविक सहायक पोलीस निरीक्षक वंसत मुळे,



यांनी केले तर मनपाचे प्रतिनिधी लिपीक मोहन लांडगे, वीज वितरण कंपनीचे सुरेंद्र वाघमारे, प्रादेशिक परिवहन कार्यालयाचे संघपाल कदम, नगरसेवक वैजनाथ देशमुख, माजी जिल्हा परिषद सदस्य मनोहर पाटील शिंदे, गजानन चव्हाण, रावसाहेब पाटील महाराज, नगरसेवक प्रतिनिधी राजू पाटील काळे, राजू लांडगे, माजी नगरसेवक श्रीनाथ यनावार, डॉ. नरेश येरावार, देवराव टिपरसे, एकनाथ वाघमारे, गोलू हंबर्डे यांच्यासह मंडळ पदाधिकारी व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. यावेळी पोलीस पाटील, नगरसेवक, मंडळ पदाधिकारी यांनी केलेल्या सुचनांची दखल घेऊन उपयोजनांबाबत संबंधित विभागाला सुचना देण्यात आल्या.

शांतता समिती बैठक यशस्वीतेसाठी गोपनीय शाखेचे पोलीस अंमलदार बालाजी दंतापल्ले, बालाप्रसाद टरके, होमगार्ड पुयड यांच्यासह कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# चंदेरी

### अभिनेत्री दिव्या दत्ताची विशेष मुलाखत

# महिलांनी आधी स्वत:ला सावरावे, मग बोलावे!



**हिंदी चित्रपटसृष्टी आणि ओटीटी विश्वात आपल्या वैविध्यपूर्ण अभिनयाने स्वतंत्र ओळख निर्माण करणाऱ्या अभिनेत्री दिव्या दत्ता सध्या 'लास्ट मॅन इन टावर' या चित्रपटामुळे चर्चेत आहेत. जवळपास तीन दशकांच्या कारकिर्दीत त्यांनी अनेक संस्मरणीय भूमिका साकारल्या असून, राष्ट्रीय पुरस्कारानेही त्यांचा गौरव झाला आहे. अलीकडे 'चिडिया'मधील त्यांच्या भूमिकेचे कौतुक झाले. 'लास्ट मॅन इन टावर'मध्ये मनोज बाजपेयी यांच्यासोबत त्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका साकारली आहे. या निमित्ताने त्यांच्याशी साधलेला संवाद...**

## आई आजही माझ्यासोबत आहे...

दिव्या दत्ता यांच्या आयुष्यात त्यांच्या आईचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. आईच्या निधनानंतर त्या बराच काळ नैराश्यात होत्या. मात्र, आजही त्यांना आई आपल्या जवळ असल्याची जाणीव होते. त्या म्हणतात, की आईसोबतचे नाते प्रत्येकासाठीच निरपेक्ष असते. या नात्यात काही व्यक्त करण्याची किंवा सांगण्याची गरज नसते. आज आई आपल्यात नाही, पण मी आजही तिच्याशी बोलते. पूर्वी माझी ताकद बाहेरून मिळायची; आज ती माझ्या आतून येते. मनात अनेक प्रश्न निर्माण होतात, संभ्रम निर्माण होतो. एखादी भूमिका करावी की करू नये, अशा द्विधा मनःस्थितीत मी अनेकदा असते. मात्र, त्याच वेळी मला माझ्या प्रश्नांची उत्तरे मिळतात. माझा विश्वास आहे की ज्यांच्यामुळे आपला जन्म झाला, त्यांच्याशी असलेले नाते त्यांच्या निधनानंतरही संपत नाही. ते कुठेही जात नाहीत. ते आपल्या आसपासच असतात. आपण अडचणीत असताना कुठेतरी ते आपला हात धरतात. आयुष्यात जेव्हा धक्के बसतात, तेव्हा ते गाडीच्या सस्पेन्शनसारखे आपल्याला सावरतात, असे दिव्या म्हणाल्या.

## महिलांनी आधी स्वत:ला सावरावे...

'लास्ट मॅन इन टावर'मध्ये दिव्या यांनी आयुष्याला कंटाळलेल्या आणि स्वतःच्या आनंदासाठी कोणत्याही टोकाला जाण्यास तयार असलेल्या महिलेची भूमिका साकारली आहे. महिलांसाठी स्वतःची खासगी जागा, स्वतःसाठी वेळ आणि स्वतःची स्वप्ने किती महत्त्वाची आहेत, याबाबत त्या स्पष्टपणे बोलतात. महिलांचे संगोपन आणि जडणघडणच अशा पद्धतीने झाली आहे की आपण आधी इतरांचा विचार करतो. अनेक जबाबदाऱ्या एकाच वेळी पार पाडण्याच्या प्रयत्नात महिला स्वतःचे जगणेच विसरून जातात. माझी स्वप्ने काय आहेत? मला काय आवडते? हेच त्या विसरतात, असे दिव्या म्हणाल्या. कोरोनाच्या काळात आम्ही बॅडमिंटन खेळायचो. एकदा मी आमच्या सोसायटीतील एका महिलेला बॅडमिंटन खेळायला येण्यास सांगितले. त्यावर त्या म्हणाल्या, की मी लहानपणी खेळायचे; आता कुठे? हे 'आता कुठे?' हेच महिलांसमोरील मोठे बंधन आहे. अनेकदा मला प्रश्न पडतो की, 'आता कुठे?' म्हणजे नेमके काय? आपल्या आजूबाजूचे जग सुंदर करण्यासाठी आधी स्वतःला सावरणे आणि स्वतःचे आयुष्य समृद्ध करणे आवश्यक आहे. स्वतः आनंदी राहणे गरजेचे आहे; त्यासाठी फार मोठे कारण असण्याचीही गरज नाही. आयुष्याला आणि स्वतःलाही प्रत्येक वेळी खूप गांभीर्याने घेण्याची गरज नाही. आपण इतरांसाठी आदर्श ठरण्याच्या प्रयत्नात स्वतःला मात्र विसरतो, असे दिव्या सांगतात.

## ट्रोलिंगकडे दुर्लक्ष करणेच योग्य

सोशल मीडिया हाताळण्याबाबत दिव्या म्हणतात, की प्रत्येक गोष्टीचे फायदे आणि तोटे असतात. आज जग खूप जवळ आले आहे. आपल्या कामाबद्दल काही सांगायचे किंवा शेअर करायचे असेल, तर ते क्षणार्धात जगभर पोहोचते. त्यावर त्वरित प्रतिक्रिया मिळते. मी या बाबतीत खूप भाग्यवान आहे की मला फारसे ट्रोलिंग सहन करावे लागले नाही. मात्र, सोशल मीडियावर खोट्या नावांमागे किंवा मुखवट्याआडून ट्रोल करणाऱ्या लोकांकडे दुर्लक्ष करणेच चांगले. महिलांविषयीचा द्वेष असो किंवा सामान्य ट्रोलिंग असो, त्यावर प्रतिक्रिया द्यायची की दुर्लक्ष करायचे, हे आपल्या हातात असते. आपली शांतता यामध्येच आहे की आपण आपले काम करत राहावे आणि त्यावरच लक्ष केंद्रित करावे. सोशल मीडियावर एक टक्का लोक कदाचित तुम्हाला ट्रोल करू इच्छित असतील; मात्र उर्वरित ९९ टक्के लोक तुमच्यावर प्रेम करणारे असतात. विशेष म्हणजे हेच लोक ट्रोल करणाऱ्यांना उत्तरही देतात. त्यामुळे आपल्या पाठीशी असंख्य लोक उभे असतात. आपण फक्त आपले चांगले काम करत राहिले पाहिजे, असेही त्या म्हणाल्या.

## बाजपेयींसोबत काम करण्याचा अनुभव



मनोज बाजपेयी यांच्यासोबत काम करण्याच्या अनुभवाबद्दल दिव्या म्हणतात, की 'लास्ट मॅन इन टावर' पूर्वीही मी मनोज बाजपेयी यांच्यासोबत 'वीर-झारा', 'स्पेशल २६', 'एलओसी कारगिल', 'ट्रॅफिक' यांसारख्या चित्रपटांत काम केले आहे. मात्र, त्या चित्रपटांमध्ये आमचे एकत्रित दृश्य नव्हते. 'लास्ट मॅन इन टावर'मध्ये पहिल्यांदाच मनोज बाजपेयी यांच्या अभिनयातील ते जादुई सामर्थ्य जवळून अनुभवण्याची संधी मिळाली. त्यांच्यासोबत काम करताना खूप आनंद झाला. लवकरच आम्ही आणखी एका चित्रपटात एकत्र दिसणार आहोत, असे दिव्या दत्ता यांनी सांगितले.

# यामी गौतम-आदित्य धर मुंबईतच राहणार

## हिमाचल प्रदेशात कायमस्वरूपी स्थलांतराच्या चर्चांना पूर्णविराम

**अभिनेत्री यामी गौतम आणि दिग्दर्शक आदित्य धर मुंबई सोडून हिमाचल प्रदेशात कायमस्वरूपी स्थायिक होणार असल्याच्या चर्चांना आता पूर्णविराम मिळाला आहे. आदित्य धर यांच्या टीमने या वृत्ताचे खंडन केले असून, हे दाम्पत्य मुंबईतच राहणार असल्याचे स्पष्ट केले आहे.**

काही दिवसांपूर्वी यामी आणि आदित्य मुंबई सोडून हिमाचल प्रदेशात कायमस्वरूपी स्थलांतर करणार असल्याचे वृत्त प्रसिद्ध झाले होते. हिमाचल प्रदेशातील सुमारे २५ एकर परिसरात असलेल्या १०० वर्षे जुन्या वारसास्थळासारख्या घरात ते राहणार असल्याचेही या वृत्तात म्हटले होते. मात्र, आता आदित्य धर यांच्या टीमने ही माहिती चुकीची असल्याचे स्पष्ट केले आहे. चर्चांबाबत आदित्य धर यांच्या टीमशी संपर्क साधण्यात आला. त्यावर टीमकडून स्पष्ट शब्दांत प्रतिक्रिया देण्यात आली, "अजिबात नाही. हे वृत्त कोण पसरवत आहे?" त्यामुळे मुंबई सोडून हिमाचलमध्ये कायमस्वरूपी स्थायिक होण्याचा या दाम्पत्याचा कोणताही निर्णय नसल्याचे स्पष्ट झाले आहे.

### 'उरी'च्या सेटवर पहिली भेट

यामी गौतम आणि आदित्य धर यांची पहिली भेट २०१९ मध्ये 'उरी : द सर्जिकल स्ट्राइक'च्या सेटवर झाली होती. आदित्य धर यांचा दिग्दर्शक म्हणून हा पहिलाच चित्रपट होता. दोघांनी २०२१ मध्ये विवाह केला. या दाम्पत्याला २०२४ मध्ये मुलगा झाला असून त्याचे नाव वेदाविद आहे. आपल्या वैयक्तिक आयुष्याबाबत हे दाम्पत्य नेहमीच प्रसिद्धीपासून दूर राहणे पसंत करते. यामी गौतम सध्या तिच्या आगामी 'नवेली' या चित्रपटामुळे चर्चेत आहे. हा चित्रपट १६ ऑक्टोबर २०२६ रोजी चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार आहे.



### स्थलांतराची चर्चा कुठून सुरू?

यामी गौतम आणि आदित्य धर मुंबई सोडणार असल्याचे वृत्त काही माध्यमांनी सूत्रांच्या हवाल्याने दिले होते. यामीचे हिमाचल प्रदेशाशी असलेले भावनिक नाते आणि तिचे जन्मगाव यामुळे हे दाम्पत्य तेथे कायमस्वरूपी वास्तव्यास जाण्याचा विचार करत असल्याचे त्यात म्हटले होते. यामी गौतमचा जन्म हिमाचल प्रदेशातील बिलासपूर येथे झाला आहे. त्यामुळे या चर्चांना आणखी बळ मिळाले होते. यामी गौतमने लग्नाआधी हिमाचल प्रदेशातील मंडी जिल्ह्यातील गोहर येथे २५ एकर जमिनीवर असलेले सुमारे १०० वर्षे जुने वारसास्थळ असलेले घर खरेदी केले होते. हे घर तिच्या कुटुंबाशी आणि बालपणीच्या आठवणींशी जोडलेले आहे. यामी आणि आदित्य धर यांनी ४ जून २०२१ रोजी याच मालमत्तेत विवाह केला होता. लाकूड आणि दगडांनी बांधलेल्या या घराभोवती मोठी बाग आहे. या परिसरात सफरचंद, बटाटे, आलुबुखार आणि आले यांसारखी पिके घेतली जातात.

### मुंबईतील खार पश्चिम परिसरात वास्तव

यामी गौतम आणि आदित्य धर सध्या मुंबईतील खार पश्चिम परिसरातील एका मोठ्या भाड्याच्या अपार्टमेंटमध्ये राहतात. २०२५च्या अखेरीस 'धुरंधर'च्या पहिल्या भागाच्या प्रचारादरम्यान आदित्यने आपल्या घराचा उल्लेख विनोदाने 'धुरंधर मार्ग' असा केला होता. हे अपार्टमेंट या दाम्पत्याने दीर्घ मुदतीसाठी भाड्याने घेतल्याचे सांगितले जाते. मात्र, 'धुरंधर'च्या मोठ्या यशानंतर त्यांनी हे घर विकत घेतल्याचेही काही वृत्तांमध्ये नमूद करण्यात आले होते.

### गेली काही वर्षे दाम्पत्यासाठी ठरली यशस्वी

आदित्य धर आणि यामी गौतम यांच्यासाठी गेली दोन-तीन वर्षे विशेष ठरली आहेत. आदित्य यांच्या 'धुरंधर' आणि 'धुरंधर : द रिव्हेंज' या चित्रपटांना मोठे यश मिळाले. दोन्ही चित्रपटांनी मिळून जगभरात ३,१२०.७४ कोटी रुपयांची कमाई केल्याचा दावा करण्यात आला आहे. याशिवाय, ७२व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार सोहळ्यात 'आर्टिकल ३७०'साठी यामी आणि आदित्य यांना पुरस्कार मिळाले. यामीची बहीण सुरिली हिने अलीकडेच आपल्या यूट्यूब वाहिनीवर सांगितले होते की, कुटुंबीयांनी यामी आणि आदित्य यांच्या राष्ट्रीय पुरस्काराच्या यशाचा आनंद फुले आणि बेसनाचा हलवा वाटून साजरा केला.

# आयुष्मान म्हणतो, माझ्यासाठी खरा सुपरस्टार नेहमीच कथा!

**आपल्या प्रत्येक चित्रपटातून वेगळ्या धाटणीच्या भूमिका साकारण्यासाठी प्रसिद्ध असलेला अभिनेता आयुष्मान खुराना लवकरच 'उडता तीर' या नव्या चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. यानिमित्ताने आतापर्यंतच्या अभिनय प्रवासाबद्दल बोलताना आयुष्मानने चित्रपटाची कथा, बदलते स्टारडम आणि प्रेक्षकांशी असलेले आपले नाते याबाबत मनमोकळेपणाने भाष्य केले.**

आयुष्मान म्हणाला, की माझा सुरुवातीपासूनच विश्वास आहे की चित्रपटाचा खरा सुपरस्टार त्याची कथा असते. गेल्या काही वर्षांत मी जवळपास २० चित्रपट केले आहेत. यामध्ये अगदी वेगळ्या धाटणीचे चित्रपट आहेत, तसेच पारंपरिक बॉलिवूड शैलीतील चित्रपटही आहेत. मात्र, आता मी पुन्हा माझ्या मुळांकडे, म्हणजेच प्रामाणिकपणाकडे वळत आहे. आपण प्रेक्षकांसमोर एखादा अस्सल आणि खरा विषय घेऊन गेलो, तर तो स्वतःच्या ताकदीवर प्रेक्षकांना चित्रपटगृहाकडे आकर्षित करू शकतो. माझा आगामी 'उडता तीर' हा चित्रपटही याच धाटणीचा आहे, असे त्याने सांगितले.

### स्टारडमची एकच व्याख्या राहिलेली नाही

आजच्या कलाकारांचे स्टारडम पूर्वीच्या काळातील कलाकारांइतके प्रभावी राहिलेले नाही, अशी चर्चा अनेकदा होते. यावर आयुष्मान म्हणाला, की आज आपण अनेक वेगवेगळ्या विश्वांमध्ये जगत आहोत. मनोरंजनाची अनेक स्वतंत्र विश्वे निर्माण झाली आहेत आणि प्रत्येक विश्वाचे स्वतःचे स्टार आहेत. यात प्रभावक आणि यूट्यूबर्सचाही समावेश होतो. काही कलाकार किंवा व्यक्ती इतके मोठे स्टार आहेत की कदाचित आपल्याला त्यांच्याबद्दल माहितीही नसेल. काही लोकांची लोकप्रियता जगभरात आहे. त्यामुळे आज स्टारडमची एक ठरावीक व्याख्या करता येणार नाही. एखादा कलाकार माध्यमांशी फारसा संवाद साधत नसेल, लोकांमध्ये मिसळत नसेल किंवा त्याच्यापर्यंत पोहोचणे कठीण असेल. दुसरीकडे, काही कलाकार प्रेक्षकांशी संवाद साधणे आणि त्यांच्याशी जोडले जाणे पसंत करतात. मला दुसरा मार्ग अधिक जवळचा वाटतो, असे आयुष्मान म्हणाला.



### माझ्या कथा जमिनीशी जोडलेल्या...

आपल्या कारकिर्दीचा उल्लेख करताना आयुष्मान म्हणाला, की मी रेडिओमधून आलो आहे. त्यानंतर दूरदर्शनवर सूत्रसंचालक म्हणूनही काम केले. त्यामुळे लोकांशी संवाद साधणे माझ्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. माझ्या कथा जमिनीशी जोडलेल्या असतात. त्या जिवंत ठेवण्यासाठी मला सामान्य लोकांशी आणि जमिनीवरच्या वास्तवाशी सतत संवाद साधत राहणे आवश्यक वाटते. यामुळे माझ्यातील कलाकारही जिवंत राहतो. माझ्या मते, स्टारडम आता एखाद्या विशेष किंवा मोजक्या लोकांसाठी राखीव असलेल्या क्लबसारखे राहिलेले नाही. आज स्टारडमच्या अनेक व्याख्या आहेत. प्रत्येक व्यक्ती आणि प्रत्येक विश्वासाठी त्याचा अर्थ वेगळा असू शकतो, असे आयुष्मानने स्पष्ट केले.

## अनुष्का शर्माने वर्सोव्यात खरेदी केले 25.80 कोटींचे दोन फ्लॅट्स

**अभिनेत्री अनुष्का शर्मा आणि भारतीय क्रिकेटपटू विराट कोहली हे वेगवेगळ्या मालमत्तांमधील गुंतवणुकीमुळे अनेकदा चर्चेत असतात. आता अनुष्का शर्माने आई आशिमा व वडील अजय कुमार शर्मा यांच्यासोबत मिळून मुंबईतील वर्सोवा परिसरात तब्बल २५.८० कोटी रुपयांचे दोन फ्लॅट्स खरेदी केल्याची माहिती समोर आली आहे.**



या खरेदीमुळे अनुष्का शर्मा आणि तिच्या कुटुंबाच्या नावावर आता त्याच मजल्यावर तीन फ्लॅट्स झाले आहेत. या तिन्ही फ्लॅट्सची एकूण किंमत सुमारे ४४ कोटी रुपये असल्याचे सांगितले जाते. यापूर्वी विराट कोहली आणि अनुष्का शर्मा यांनी गोदरेज स्कायशोर प्रकल्पात २,६४४ चौरस फुटांचा फ्लॅट १८.२९ कोटी रुपयांना खरेदी केला होता. या व्यवहाराची नोंदणी २१ जुलै २०२६ रोजी झाली होती. या फ्लॅटसोबत ३१६ चौरस फुटांचा स्वतंत्र क्षेत्रफळाचा भाग आणि तीन वाहनतळ उपलब्ध आहेत. अभिनेत्री तब्बू यांनीही एप्रिल २०२६ मध्ये याच इमारतीत २,१५३ चौरस फुटांचा फ्लॅट खरेदी केला होता. त्यामुळे या इमारतीतील सेलिब्रिटींच्या मालमत्ता गुंतवणुकीची चर्चा झाली होती.

### विराट-अनुष्काची 8 एकर जमिनीत गुंतवणूक

विराट कोहली आणि अनुष्का शर्मा यांनी २०२२ मध्येही मोठी मालमत्ता खरेदी केली होती. या सेलिब्रिटी दाम्पत्याने सुमारे १९ कोटी रुपयांना ८ एकर जमीन खरेदी केली होती. या भूखंडावर त्यांनी आलिशान व्हिला उभारला आहे. या व्हिलामध्ये तापमान नियंत्रित जलतरण तलाव, विशेष रचनेचे स्वयंपाकघर, चार स्नानगृहे, मोठी बाग, आच्छादित वाहनतळ तसेच कर्मचाऱ्यांसाठी आवश्यक सुविधांचा समावेश आहे.

# कियारा अडवाणी दुसऱ्यांदा आई होणार

**अभिनेत्री कियारा अडवाणी आणि अभिनेता सिद्धार्थ मल्होत्रा यांनी चाहत्यांना आनंदाची बातमी दिली आहे. कियारा दुसऱ्यांदा आई होणार असून, या वृत्ताला दाम्पत्याने बुधवारी सोशल मीडियावरून दुजोरा दिला. या दोघांना यापूर्वी एक मुलगी असून, तिचा जन्म जुलै २०२५ मध्ये झाला होता. आता हे दाम्पत्य आपल्या दुसऱ्या अपत्याच्या आगमनाची प्रतीक्षा करत आहे.**

कियारा आणि सिद्धार्थ यांनी संयुक्तपणे सोशल मीडियावर एक छायाचित्र शेअर करत ही आनंदाची बातमी दिली. या छायाचित्रात त्यांची मुलगी सरायाह एका छोट्याशा पांढऱ्या मोज्याला हातात धरून असल्याचे दिसत आहे. कियारा आणि सिद्धार्थ तिच्या छोट्या हाताला आधार देताना दिसतात. छायाचित्रासोबत त्यांनी लिहिले, "पुन्हा एकदा आम्हाला आयुष्यातील सर्वात मोठ्या भेटीने सन्मानित करण्यात आले आहे. आमचे मन प्रेम आणि कृतज्ञतेने भरून आले आहे." ही पोस्ट समोर येताच चाहत्यांसह चित्रपटसृष्टीतील अनेक कलाकारांनी कियारा आणि सिद्धार्थ यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव केला. कियारा अडवाणीने काही दिवसांपूर्वी एका पॉडकास्टमध्ये मातृत्वाविषयी मनमोकळेपणाने भाष्य केले होते. राज शमानी यांच्याशी संवाद साधताना तिने आई झाल्यानंतर आयुष्यात मोठा बदल झाल्याचे सांगितले होते. "आई होण्यापूर्वी मी जशी होते, त्यापेक्षा आता स्वतःला पूर्णपणे वेगळी व्यक्ती समजते," असे कियाराने म्हटले होते. चित्रपटाच्या चित्रीकरणासाठी पुन्हा कामावर परतण्याबाबत बोलताना तिने आई झाल्यानंतर स्वतःमध्ये मोठा आत्मविश्वास निर्माण झाल्याचे सांगितले होते. "आई झाल्यानंतर मला स्वतःमध्ये एका शेरणीसारखी ताकद जाणवते," असे कियारा म्हणाली होती.

» 'शेरशाह'च्या सेटवर फुलले प्रेम : सिद्धार्थ मल्होत्रा आणि कियारा अडवाणी यांची 'शेरशाह' चित्रपटाच्या चित्रीकरणादरम्यान जवळीक वाढली. ७ फेब्रुवारी २०२३ रोजी जैसलमेर येथील सूर्यगढ पॅलेसमध्ये एका खासगी समारंभात दोघांनी विवाह केला. त्यांच्या विवाहाला कुटुंबीय आणि जवळच्या मित्रपरिवाराची उपस्थिती होती.

» करण जोहरने दिली होती नात्याची माहिती : कियारा आणि सिद्धार्थ यांच्या नात्याची चर्चा २०२० पासूनच सुरू होती. मात्र, दोघांनीही त्यावेळी आपल्या नात्याबाबत सार्वजनिकपणे काहीही सांगितले नव्हते. २०२२ मध्ये दिग्दर्शक करण जोहरने 'कॉफी विथ करण' या कार्यक्रमात कियाराचा उल्लेख सिद्धार्थची प्रेयसी म्हणून केला. त्यानंतर दोघांच्या नात्याची चर्चा अधिकृतपणे समोर आली.

# सप्तशृंगगडावर नवरात्रोत्सवाची जय्यत तयारी; भाविकांसाठी २४ तास मंदिर खुले

**नाशिक (प्रतिनिधी)–** साडेतीन शक्तिपीठांपैकी अर्धपीठ असलेल्या नाशिक जिल्ह्यातील सप्तशृंगगडावर शारदीय नवरात्रोत्सवाची तयारी पूर्ण झाली आहे. उद्या, ११ ऑक्टोबरपासून नवरात्रोत्सवाला सुरुवात होत असून, आदिमायेच्या दर्शनासाठी राज्यासह परराज्यांतून लाखो भाविक दाखल होण्याची शक्यता आहे. भाविकांची गर्दी लक्षात घेऊन मंदिर व्यवस्थापन आणि प्रशासन सज्ज झाले आहे. दर्शनासाठी स्टीलचे बॅरिकेडिंग, मंदिर परिसरात ३११ सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची नजर आणि पोलिसांचा तगडा बंदोबस्त तैनात करण्यात येणार आहे. दरम्यान, घाटरस्त्यावर वाहतूक कोंडी होऊ नये आणि भाविकांचा



प्रवास सुरळीत व्हावा, यासाठी सप्तशृंगगडावर जाणाऱ्या खासगी वाहनांना २० ऑक्टोबरपर्यंत प्रवेशबंदी घालण्यात आली आहे.

सप्तशृंगगडावरील आदिमायेच्या मंदिरात नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर विविध तयारी पूर्ण करण्यात आली आहे. मंदिराच्या गाभाऱ्यात आकर्षक चांदीचे मखर बसवण्यात आले आहे. नवरात्रोत्सवात मोठ्या संख्येने भाविक दर्शनासाठी येत असल्याने गर्दीचे व्यवस्थापन आणि दर्शनाची प्रक्रिया सुलभ करण्यावर मंदिर प्रशासनाने भर दिला आहे.

भाविकांना रांगेतून व्यवस्थित दर्शन घेता यावे, यासाठी स्टीलचे बॅरिकेडिंग करण्यात आले आहे. मंदिर विश्वस्त आणि व्यवस्थापन मंडळाकडून भाविकांना आवश्यक सोयी–सुविधा उपलब्ध करून देण्याची तयारी करण्यात आली आहे. नवरात्रोत्सवाच्या काळात मंदिर भाविकांसाठी २४ तास खुले राहणार असल्याने भाविकांना दिवसरात्र देवीचे दर्शन घेता येणार आहे.

नवरात्रोत्सव काळात सप्तशृंगगडावर होणारी गर्दी लक्षात घेता सुरक्षेच्या दृष्टीने विशेष उपाययोजना करण्यात आल्या आहेत. मंदिराचा गाभारा आणि परिसरात एकूण ३११ सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या माध्यमातून नजर ठेवण्यात येणार आहे. गर्दीवर नियंत्रण ठेवणे, भाविकांच्या हालचालींवर लक्ष ठेवणे आणि कोणतीही अनुचित घटना घडू नये, यासाठी या यंत्रणेची मदत घेतली जाणार आहे. याशिवाय, वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांसह मोठा पोलीस बंदोबस्त तैनात राहणार आहे. नवरात्रोत्सव शांततेत आणि सुरळीत पार पडावा, यासाठी पोलीस प्रशासन आणि मंदिर व्यवस्थापनाकडून समन्वयाने नियोजन करण्यात आले आहे.

नवरात्रोत्सव काळात सप्तशृंगगडावर जाणाऱ्या खासगी वाहनांना प्रवेशबंदी घालण्यात आली आहे. ९ ऑक्टोबर ते २० ऑक्टोबर या कालावधीत ही बंदी लागू असल्याची माहिती देण्यात आली आहे. घाटरस्त्यावर वाहतूक कोंडी होऊ नये, भाविकांना प्रवासात अडचणी येऊ नयेत आणि गडावर वाहतुकीचे योग्य नियोजन करता यावे, या उद्देशाने प्रशासनाने हा निर्णय घेतला आहे.

# वातावरण बदललं महाराष्ट्रात उष्णतेची भयंकर लाट येणार; हवामान खात्याचा अंदाज

**मुंबई (प्रतिनिधी)–** पावसाळा संपताच आता संपूर्ण देशातील वातावरण बदललं आहे. हवामानात अचानक बदल झाला आहे. मुंबईसह महाराष्ट्रात प्रचंड उकाडा निर्माण झाला आहे. हवामानात अचानक झालेल्या बदलामुळे आरोग्याच्या समस्याही उद्भवत आहेत. प्रचंड उकाड्याने राज्यातील नागरिकांची लाही लाही झाली. त्यातच आता आयएमडीने मोठा इशारा दिला आहे. मुंबईसह महाराष्ट्रात येत्या १२ ऑक्टोबर पर्यंत उष्णतेची लाट येणार असल्याचा हवामान खात्याने इशारा दिला आहे. त्यामुळे नागरिकांनी सावधगिरी बाळगली पाहिजे. उष्म्याचा त्रास होणार नाही, याची काळजी घेण्याचं आवाहन राज्यातील नागरिकांना करण्यात येत आहे.

हवामान खात्याच्या अंदाजानुसार, दक्षिण कोकणातील काही जिल्ह्यातही उष्णतेची लाट येणार आहे. उत्तर कोकण जिल्ह्यात काही ठिकाणी उकाडा आणि दमट वातावरण राहणार आहे. येत्या ४८ तासात महाराष्ट्रात काही भागातील तापमानात २–३ डिग्री सेल्सिअसने आणि त्यानंतर १–३ डिग्री सेल्सिअसने वाढणार आहे. तर महाराष्ट्रातील इतर जिल्ह्यातील तापमान ३७–३९ डिग्री सेल्सिअसपर्यंत तापमान राहणार असल्याचं हवामान खात्याचं म्हणणं आहे.

विदर्भातही प्रचंड उकाडा निर्माण झाला आहे. आतापासूनच संपूर्ण विदर्भात ऑक्टोबर हिटचे चटके जाणवत आहेत. विदर्भातील तापमानात मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. विदर्भात तापमान ४० अंश सेल्सियसच्या जवळ पोहचलं आहे. नागपुरात ३६ अंश



सेल्सियस तापमानाची नोंद झाली आहे. तर इतर जिल्ह्यात सुद्धा तापमानात मोठी वाढ झाली आहे. तापमानसोबतच उकाडा वाढल्याने नागरिक हैराण झाले आहेत.

ऑक्टोबरमध्येच उन्हाचे चटके आणि उकाडा जाणवत असल्याने आरोग्याच्या समस्या निर्माण झाल्या आहेत. मोसमी पावसाने माघार घेतल्यानंतर नागपूर शहरात ऑक्टोबर हिटचा तडाखा बसला आहे. नागपुरातील तापमान गेल्या काही दिवसांपासून ३५ डिग्री सेल्सिअसच्या पुढे गेले आहे. पुढील काही दिवस उकाडा असाच कायम राहण्याचा हवामान विभागाचा अंदाज आहे.

मुंबईत पावसाळा संपल्यानंतर अवघ्या काही दिवसांतच उष्णतेचा पारा वाढला आहे. गुरुवारी सांताक्रूझ येथे कमाल तापमान ३७.६ अंश सेल्सिअस नोंदवण्यात आले. हे तापमान सामान्यपेक्षा तब्बल ४.५ अंशांनी अधिक असल्याची नोंद हवामान विभागाने केली आहे. त्यामुळे मुंबई आणि रायगड जिल्ह्यातील काही भागांसाठी भारतीय हवामान विभागाने आज देखीलउष्णतेचा इशारा दिला आहे.

# अभिजीत दिपकेंनी केले जाहीर! आमच्यानंतर अजिंक्य शिंदे आंदोलनाचे नेतृत्व करणार

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** केंद्रीय निवडणूक आयोगाचे मुख्य आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्याविरोधात एल्गार पुकारत दिल्लीच्या जंतरमंतर येथे पुन्हा आंदोलन करण्याच्या तयारीत असलेले कॉकरोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजीत दिपके यांना पोलिसांनी शनिवारी सकाळी ताब्यात घेतले होते. अभिजीत दिपके यांचे विमानतळ सकाळी दिल्ली विमानतळाच्या धावपट्टीवर उतरताच पोलिसांच्या पथकाने लगेच विमानाच्या आत जाऊन दिपके, आशुतोष रांका आणि सौरव दास यांना ताब्यात घेऊन त्यांना अटक केली होती. त्यांना तातडीने एका बसमधून अज्ञातस्थळी रवाना करण्यात आले होते. सीजेपीच्या तिन्ही महत्त्वाच्या नेत्यांना अटक झाल्याने दिल्लीत आज होणाऱ्या



जंतर मंतर येथील सीजेपीच्या आंदोलनाचे भवितव्यच धोक्यात आले होते. हे आंदोलन निर्णायकी स्थितीत विखुरले जात असताना अभिजीत दिपके यांनी एक व्हिडीओ शेअर करत महत्त्वाची घोषणा केली. अभिजीत दीपके यांनी ते पोलिसांच्या ताब्यात असेपर्यंत सीजेपीच्या नव्या नेत्याच्या नावाची घोषणा केली आहे.

सीजेपीच्या दिल्लीतील आंदोलनाचे नेतृत्व आता अजिंक्य शिंदे हा करेल. आशुतोष रांका, सौरव दास आणि मला दिल्ली पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. त्यामुळे आमच्या तिघांनंतर अजिंक्य शिंदे हा आंदोलनाचे नेतृत्व करेल. तुम्ही माझा हा व्हिडीओ बघत असाल तर अजिंक्य शिंदे याच्या मार्गदर्शनानुसार काम करा. आमच्या तिघांनंतर आंदोलनाची सूत्रे तो सांभाळेल, असे अभिजीत दिपके यांनी व्हिडीओत म्हटले आहे.

## जम्मू-काश्मीरमध्ये CISF जवानाचा गोळी लागून मृत्यू; चौकशीचे आदेश

**जम्मू–काश्मीर (वृत्तसंस्था)–** जम्मू–काश्मीरमधील रियासी जिल्ह्यात केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलाच्या जवानाचा गोळी लागून मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे. मोहम्मद मुश्ताक (वय ३७) असे मृत जवानाचे नाव असून, ते रियासी जिल्ह्यातील मर्दी गावचे रहिवासी होते. कर्तव्यावर असताना घडलेल्या या घटनेमुळे परिसरात चर्चा सुरू झाली आहे. जवानाला गोळी नेमकी कोणत्या परिस्थितीत लागली, याचा तपास सुरू आहे. मिळालेल्या माहितीनुसार, गोळी लागल्यानंतर मोहम्मद मुश्ताक यांना तातडीने रियासी येथील जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यानंतर पुढील उपचारांसाठी त्यांना दुसऱ्या रुग्णालयात हलवण्याचा निर्णय घेण्यात आला. मात्र, उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला.

# महाराष्ट्र दुष्काळमुक्त करण्यासाठी पाण्याचा प्रत्येक थेंब अडवणार – मुख्यमंत्री फडणवीस

**मुंबई (प्रतिनिधी)–** राज्यातील दुष्काळी परिस्थितीवर कायमस्वरूपी मात करण्यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने, नियोजनबद्ध आणि गतिमान पद्धतीने काम करावे. 'पाणी अडवा, पाणी जिरवा' या संकल्पनेला प्राधान्य देऊन पावसाच्या पाण्याचा



प्रत्येक थेंब अडविण्यासाठी जलसंधारणाची कामे प्रभावीपणे राबवावीत. पानी फाउंडेशनसह विविध स्वयंसेवी संस्थांच्या कामांना प्रशासकीय यंत्रणेने सक्रिय सहकार्य करून जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी आणि क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी समन्वयातून या मोहिमेला गती द्यावी, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी दिले.

यावर्षी राज्यात वॉटर कप अभियान लवकर सुरू होत असून, या पार्श्वभूमीवर वर्षा निवासस्थानी आयोजित जलसंधारणविषयक बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, दुष्काळाच्या आव्हानावर मात करण्यासाठी सर्व विभागांनी एकत्रितपणे प्रयत्न करणे आवश्यक आहे. यापूर्वी जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, कृषी विभागाचे अधिकारी आणि क्षेत्रीय यंत्रणेने विविध कार्यक्रमांच्या अंमलबजावणीत उत्तम नेतृत्व व कार्यक्षमता दाखविली आहे. अडचणीच्या काळात प्रशासकीय यंत्रणा उत्साहाने आणि जबाबदारीने कामाला लागल्यास कामाचा वेग वाढतो, हे आपण अनुभवले आहे. संपूर्ण महाराष्ट्रात पहाटेपासून काम सुरू असल्याचे चित्र यापूर्वी दिसले आहे. त्याच कार्यतत्परतेने आणि समर्पित भावनेने आता जलसंधारणाच्या कामांसाठी पुढाकार घेण्याची गरज आहे. जलसंधारणाच्या कामांसाठी या बैठकीत निश्चित झालेल्या संकल्पनांच्या आधारे एकात्मिक कार्ययोजना तयार करावी. तिच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सक्षम प्रशासकीय यंत्रणा उभारण्याबरोबरच कामांच्या प्रगतीवर लक्ष ठेवण्यासाठी तंत्रज्ञानाधारित संनियंत्रण प्रणाली विकसित करावी. विविध विभागांच्या कामांचे एकत्रीकरण करून परस्पर समन्वयातून अंमलबजावणी करावी. सर्व संबंधित यंत्रणांनी सक्रिय सहभाग घेत कामांना विलंब होणार नाही, याची दक्षता घ्यावी, असेही त्यांनी सांगितले.

जलसंधारणाची कामे केवळ कागदावरील नियोजनापुरती मर्यादित न राहता प्रत्यक्षात परिणामकारकपणे पूर्ण झाली पाहिजेत. पहिला पाऊस पडताच पाणी अडविण्यासाठी जलसंधारणाच्या संरचना सज्ज असतील आणि त्यातून भूजलपातळीत वाढ होण्यास मदत होईल, अशा पद्धतीने कामांचे नियोजन व अंमलबजावणी करावी. या प्रयत्नांतून गावांना दुष्काळमुक्त करण्याच्या दिशेने ठोस पावले टाकता येतील आणि जनतेला मोठा दिलासा मिळेल, असा विश्वास मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केला.

## अमेरिकेत अंदाधुंद गोळीबार, मुलांसह ९ जणांचा मृत्यू

**पेनसिल्व्हेनिया (वृत्तसंस्था)–** अमेरिकेच्या पेनसिल्व्हेनिया राज्यात शुक्रवारी संध्याकाळी झालेल्या अंदाधुंद गोळीबारात मुलांसह ९ जणांचा मृत्यू झाला. पोलिसांच्या म्हणण्यानुसार, संशयित हल्लेखोरही मृतावस्थेत आढळला. त्याने स्वतः वर गोळी झाडल्याची शक्यता आहे. ही घटना एरी शहरातील पेरी स्ट्रीटवर घडली.

अमेरिकन वृत्तवाहिनी थउतइ नुसार, २४ सप्टेंबरपर्यंत यावर्षी अमेरिकेत सामूहिक गोळीबाराच्या ३४३ घटना नोंदवण्यात आल्या होत्या. या घटनांमध्ये ३२० हून अधिक लोकांचा मृत्यू झाला. घटनास्थळी पोहोचलेल्या पोलिसांना रस्त्यावर दोन महिलांचे मृतदेह आढळले. वृत्तानुसार, त्यापैकी एक महिला गर्भवती होती. त्यानंतर पोलिस आणि विशेष कमांडो पथकाने घराला वेढा घातला. यादरम्यान घरातून पुन्हा गोळ्या झाडल्याचे आवाज ऐकू आले. नंतर पोलिसांनी घरात प्रवेश केला असता, तेथे आणखी सात जणांचे मृतदेह आढळले.

# रियाध विमानतळावर पुन्हा हल्ला, २४ तासांत २२५ उड्डाणे रद्द; २० दिवसांत चौथा हल्ला

**रियाध (वृत्तसंस्था)–** सौदी अरेबियाची राजधानी रियाधमधील किंग खालिद आंतरराष्ट्रीय विमानतळावर शनिवारी पुन्हा हल्ला झाला. रियाधच्या किंग खालिद आंतरराष्ट्रीय विमानतळावर गेल्या २० दिवसांत हा चौथा हल्ला आहे.

फ्लाइट ट्रॅकिंग वेबसाइट फ्लाइटअवेअरच्या माहितीनुसार, हल्ल्यामुळे गेल्या २४ तासांत विमानतळावरील किमान २२५ उड्डाणे रद्द करण्यात आली. येमेनमधील हूथी बंडखोर आणि सौदी अरेबियाच्या पाठिंब्याने लढणाऱ्या येमेनच्या सरकारी सैन्यातील संघर्ष तीव्र झाला आहे. सौदी अरेबिया हवाई हल्ल्यांद्वारे येमेनच्या सरकारी सैन्याला मदत करत आहे. लाल समुद्राजवळ हूथींची अलीकडील वाढती आघाडी रोखणे हा त्यामागचा उद्देश आहे.

हूथींनी या आठवड्यात आंतरराष्ट्रीय विमान कंपन्यांना इशारा दिला होता की, सौदी अरेबियाच्या हवाई क्षेत्रात उड्डाणे चालवल्यास त्याचे गंभीर परिणाम होऊ शकतात. त्यांनी सौदी हवाई क्षेत्राला आपल्या लष्करी कारवायांचे क्षेत्र म्हणून घोषित केले होते. मात्र, शनिवारच्या हल्ल्याची जबाबदारी हूथींनी तातडीने स्वीकारली नाही. सौदी सरकारकडूनही या हल्ल्याबाबत त्वरित कोणतेही अधिकृत वक्तव्य आले नाही.

सौदी अरेबियाने आपल्या विमानतळांवर, लष्करी तळांवर आणि तेलाशी संबंधित ठिकाणांवर झालेल्या हल्ल्यांच्या पार्श्वभूमीवर अमेरिका आणि इतर मित्रदेशांकडे मदत मागितली आहे. अधिकाऱ्यांच्या मते, अमेरिकेच्या मदतीमध्ये गुप्तचर माहितीची देवाणघेवाण, हल्ल्यासाठी ठिकाणे निश्चित करणे आणि लष्करी योजना तयार करण्यासाठी सहकार्य यांचा समावेश आहे.

शुक्रवारी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना रियाध विमानतळावर झालेल्या हल्ल्यांबाबत विचारण्यात आले. त्यांनी म्हटले, हे चांगले नाही आणि मी आनंदी नाही. मात्र, या हल्ल्यांच्या प्रत्युत्तरात अमेरिकेकडून लष्करी मदत देण्याचा कोणताही संकेत मिळालेला नाही. सौदी अरेबियातील वाढत्या धोक्याच्या पार्श्वभूमीवर अनेक आंतरराष्ट्रीय विमान कंपन्यांनी रियाध आणि सौदी अरेबियातील इतर विमानतळांसाठीची उड्डाणे थांबवली आहेत.

यामध्ये एअर इंडिया, फ्लायदुबई, लुफ्थांसा समूह आणि पाकिस्तान इंटरनॅशनल एअरलाइन्सचा समावेश आहे. युरोपीय संघाच्या विमान वाहतूक सुरक्षा संस्थेनेही सौदीच्या हवाई क्षेत्राबाबतचा इशारा अधिक तीव्र केला आहे. संस्थेच्या म्हणण्यानुसार, हूती बंडखोर आता सौदी अरेबियाच्या अंतर्गत भागांपर्यंत हल्ले करण्यास सक्षम आहेत आणि विमानतळांसारख्या विमान वाहतूक ठिकाणांवरही त्यांचे लक्ष वाढले आहे.

## सोने २ हजार रुपयांनी महागले, दीड लाखांचा टप्पा पार

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** ९ ऑक्टोबर रोजी सोन्या–चांदीच्या दरात तेजी आहे. इंडिया बुलियन अँड ज्वेलर्स असोसिएशन नुसार, १० ग्रॅम २४ कॅरेट सोन्याचा दर १,९६८ रुपयांनी वाढून १.५० लाख रुपयांवर पोहोचला आहे.

यावर्षी सोन्या–चांदीच्या दरात सातत्याने चढ–उतार पाहायला मिळत आहेत. २०२६ मध्ये आतापर्यंत सोने १६,४१५ रुपयांनी महागले आहे. त्याचवेळी, चांदी ९,२५० रुपयांनी स्वस्त झाली आहे. ३१ डिसेंबर २०२५ रोजी १० ग्रॅम सोन्याचा दर १.३३ लाख रुपये होता, जो आता १.५० लाख रुपयांवर पोहोचला आहे.

त्याचवेळी, ३१ डिसेंबर २०२५ रोजी चांदीचा दर २.३० लाख रुपये प्रति किलो होता, जो आता २.२१ लाख रुपयांवर पोहोचला आहे. या काळात २९ जानेवारी रोजी सोन्याने १.७६ लाख रुपये आणि चांदीने ३.८६ लाख रुपयांचा सर्वकालीन उच्चांक गाठला होता.

# US आता रशियाकडून डिझेल खरेदी करणार; या करारामुळे जगभरात दर कमी होण्याचे संकेत

**वॉशिंग्टन (वृत्तसंस्था)–** अमेरिकेने रशियाकडून डिझेल खरेदी करण्यासाठी करार केला आहे. ट्रम्प यांनी शुक्रवारी याची माहिती देताना सोशल मीडियावर म्हटले. त्यांच्या माहितीनुसार, या कराराअंतर्गत रशिया तातडीने ३ लाख टनांहून अधिक डिझेल पाठवेल. त्यानंतर नोव्हेंबरमध्ये ५ लाख टन आणि पुढे १० लाख टन डिझेल पाठवले जाईल.

विशेष म्हणजे, सप्टेंबरमध्येच ट्रम्प यांनी रशियावर निर्बंध लादण्याच्या कायद्यावर स्वाक्षरी केली होती. त्याअंतर्गत रशियाकडून तेल खरेदी करणाऱ्या देशांवर ट्रम्प १००% पर्यंत शुल्क लागू करू शकतात. यात भारत आणि चीनसारख्या देशांचा समावेश आहे.रशियाचे राष्ट्राध्यक्ष पुतीन १५ ऑगस्ट २०२५ रोजी अलास्कात पोहोचले होते. यावेळी त्यांनी राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांच्यासोबत युक्रेनमधील युद्ध संपवण्याबाबत चर्चा केली होती.

रशियाचे राष्ट्राध्यक्ष पुतीन १५ ऑगस्ट २०२५ रोजी अलास्कात पोहोचले होते. यावेळी त्यांनी राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांच्यासोबत युक्रेनमधील युद्ध संपवण्याबाबत चर्चा केली होती.हा करार रशियावर दबाव आणण्याच्या अमेरिकेच्या धोरणातील मोठा बदल आहे. युक्रेनमधील युद्धामुळे अमेरिका अनेक वर्षांपासून रशियावर निर्बंध लावत आहे. ट्रम्प यांनी सोशल मीडियावर सांगितले की, त्यांनी पुतीन यांच्याशी फोनवर संवाद साधून हा करार केला. त्यांनी सांगितले की, कमी किमती विशेषतः अमेरिकी शेतकरी, पशुपालक आणि ट्रकचालकांसाठी, ही त्यांची सर्वात मोठी प्राथमिकता आहे.



शुक्रवारी व्हाइट हाऊसमधून निवडणूक रॅलीसाठी रवाना होताना ट्रम्प यांनीही या कराराबद्दल आनंद व्यक्त केला. झेलेन्स्की म्हणाले की, रशिया या कराराच्या बदल्यात दहशत आणि फसवणूकच पसरवेल. हा करार युद्ध लांबवण्यास रशियाला मदत करेल. झेलेन्स्की म्हणाले की, हा करार रशियाच्या हिताचा आहे. यामुळे तो अधिक लोकांना मारू शकेल आणि जगाचे अधिक नुकसान करू शकेल. इराणमधील युद्धामुळे जगभरात तेलाच्या किमती वाढल्या आहेत. मात्र, शुक्रवारी ट्रम्प यांच्या घोषणेनंतर डिझेलच्या किमतीत घट झाली. सेंटर फॉर स्ट्रॅटेजिक अँड इंटरनॅशनल स्टडीजचे ऊर्जा तज्ज्ञ क्लेटन सीगल यांनी सांगितले की, या करारामुळे किमतींवर फारसा परिणाम होण्याची अपेक्षा नाही.

त्यांनी सांगितले की, याचा रशिया आणि पुतीन यांना मोठा फायदा होईल. तर, एनर्जी पॉलिसी रिसर्च फाउंडेशनचे मायकेल लिंच यांनी या कराराची तुलना बुडणाऱ्या जहाजाशी केली.


## Change In Name

My Old Name is **Sayyed Ishaq Shikurasab** which Now I am changing as New Name- **Isak Shikursab Sayyad** Henceforth.My All correspondence will be Done as per My Name. please consider the same.
Address:- At. Post wadgaon Tq. Mukhed dist. nanded Maharashtra-431715
Mo.No. 9158420542

## Change In Name

My old name is **KULSUM BANU KOTHARI** which is now i am changing New name **KULSUM BANU MOHAMMED NADEEM KOTHARI** hence forth my all correspondence will be done as per my new name, please consider the name.
Address :- Near Roorani Masjid, ameshwar Plot, Parbhani, po: parbhani,Dist: Parbhani, Maharashtra-431401


### जाहीर सुचना

आम जनतेस सूचित करण्यात येते की, माझे पक्षकार सुधाकर दगडू हटकर आणि अविनाश सुधाकर हटकर रा. निवघा ता. हदगाव जि. नांदेड यांच्या सूचने प्रमाणे, सुधाकर दगडू हटकर आणि अविनाश सुधाकर हटकर हे काही खाजगी कामानिमित नांदेड बस स्टोप येथुन हदगाव येथे प्रवास करत असताना दि. ०९.०९.२०२६ दुपारी: 2 वाजता त्यांच्या विक्रीखत क्र. २३७९/२०१२ दिनांक २६.१२.२०१२ ज्याचे ग्रामपंचायत मालमत्ता क्र . २३६७/१७ ज्याची लांबी पूर्व-पश्चिम :४० फुट रुंदी दक्षिण -उत्तर: २५ फुट एकूण: १००० चौ. फुट सदर जागेची चतु:सीमा पूर्व: 20 फुट रस्ता, पश्चिम: घर क्र. २३६६/१६, दक्षिण: 20 फुट रस्ता, उत्तरस: घर क्र. २३६८/१८ ह्या चतु:सीमे मध्ये मोकळी जागा आहे जे माझे विक्रीखत क्र. २३७९/२०१२ दिनांक २६.१२.२०१२ हि लिंक खरेदी खात माझे पक्षकार सुधाकर दगडू हटकर आणि अविनाश सुधाकर हटकर यांच्या कडून गहाळ झाली आहेत. तरीही कोणाला मूळ प्रत सापडल्यास, आढळल्यास, माझ्या पक्षकार सुधाकर दगडू हटकर आणि अविनाश सुधाकर हटकर आणि शुभम होऊसिंग फियनानांस कंपनीकडून गृह कर्ज घेण्यास नितांत आवश्यकता आहे . तरी जर कोणाला लिंक खरेदी खात कॉस मिळाली असेल तर खालील पत्यावर कळवावे, किंवा कुठल्याही व्यक्तीला/वित्तीय संस्थेला, या मालमत्ते संदर्भात 7 दिवसांच्या आत मला खालील पत्यावर कळवावे. जर 7 दिवसांच्या आत कुणाचाही अथवा कुठल्याही स्वरूपाचा हक्क/अधिकार आक्षेप आल्यास संपर्क करावा जर 7 दिवसाच्या नंतर कोणाचाही अथवा कुठल्याही स्वरूपाचा हक्क/अधिकार/आक्षेप आल्यानंतर स्वीकारण्यात येणार नाही अथवा माझया पक्षकाराला बंधनकारक राहणार नाही.

स्थळ: नांदेड
दिनांक:

ॲड. वाय.एस. देशमुख अर्धापुरकर,
गुरुकृपा मार्केट, दुसरा मजला, महावीर चौक, नांदेड.
मो. 9420911620


## Change In Name

My old name is **RAFIK** which is now i am changing New name **SHAIKH RAFIQ SHAIKH AHMED** hence forth my all correspondence will be done as per my new name, please consider the name.
Address :- NIAR RAILWAY STATION MADINA NAGAR, MUDKHED, NANDED, MAHARASHTRA 431806 Mo. No. 9421370691

## Change In Name

My old Name is **SAMIRSHAHA SAMADSHAHA** Which now I am Changing as New Name **SAMIR SHAHA SAMAD SHAHA.** Henceforth my all correspondence will be done as per my new name. Please consider the name
**Address: 1-13-498 peer burhan nagar gali no 13, Nanded, maharashtra-431605**

## Change In Name

My old Name is **SK MD SALEEM** which now I am Changing as New Name **MOHAMMAD SALEEM MOHAMMAD GANI**. Hence forth My All Correspondence will be done as Per my new name. Please consider the same.
Sign by - MOHAMMAD SALEEM MOHAMMAD GANI
Address: Chaitanya Nagar Rouf Colony Near Masjid Taqwa Nanded-431605 Mob. 8668923070

## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.



संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८

**रामबाण ईलाज**

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

**सेवा क्लिनीक**

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९७०१, ९८६०७२१३५६

# गोदातीर समाचार

**पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस**

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308



# पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या विकसित भारत स्वप्नपूर्तीसाठी पुढे या! -खा. अशोकराव चव्हाण

## ◆ हजारो विद्यार्थ्यांनी रंगवला त्यांच्या स्वप्नातला भारत

**नांदेड (प्रतिनिधी)–** भारताला २०४७ पर्यंत विकसित राष्ट्र बनविण्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे स्वप्न साकार करण्यासाठी प्रत्येक भारतीयाने पुढे यावे व या संकल्पासाठी झोकून काम करावे, असे आवाहन राज्याचे माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण यांनी केले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या राज्य व देशाचे नेतृत्त्व करताना सार्वजनिक सेवेतील २५ वर्षांच्या प्रवासानिमित्त भारतीय जनता पक्ष महानगरच्या वतीने अध्यक्ष आ. अमरनाथ राजूरकर यांच्या पुढाकारातून शनिवारी (१० ऑक्टोबर) सकाळी यशवंत महाविद्यालयाच्या मैदानावर शालेय विद्यार्थ्यांसाठी 'विकसित स्वप्नांचा भारत' या विषयावर चित्रकला व रंगभरण स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी खा. चव्हाण बोलत होते. व्यासपीठावर भाजप युवा मोर्चाचे प्रभारी सुनील राणे, महानगराध्यक्ष आ. अमरनाथ राजूरकर, माजी मंत्री डी. पी. सावंत यांच्यासह भाजपचे लोकप्रतिनिधी व पदाधिकारी उपस्थित होते.




यावेळी पुढे बोलताना खा. चव्हाण म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०४७ पर्यंत भारताला विकसित राष्ट्र बनविण्याचे ध्येय निश्चित केले असून, या संकल्पनेच्या केंद्रस्थानी देशातील युवा शक्ती आहे. तरुण हा विकसित भारताच्या निर्मितीतील महत्त्वाचा घटक आणि या विकासाचा लाभार्थीही आहे. तरुणांना सक्षम करण्यासाठी सरकारने 'स्टार्टअप इंडिया', 'स्किल इंडिया' आणि नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणासारखे उपक्रम राबविले आहेत. नव्या संधींचा लाभ घेत तरुणांनी देशाच्या प्रगतीत सक्रिय योगदान द्यावे, असे त्यांनी सांगितले. यशवंत महाविद्यालयाच्या मैदानावर हजारो चिमुकल्या विद्यार्थ्यांनी चित्रकला व रंगभरण स्पर्धेत उत्साहाने सहभाग घेतला. आपल्या कल्पनाशक्तीला रंग देत विद्यार्थ्यांनी विकसित भारताचे चित्र कुंचल्यातून साकारले. आज चित्रांमधून व्यक्त होणारी ही बालपिढी २०४७ मध्ये देशाच्या विकासाची धुरा सांभाळणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये देशाच्या भविष्याविषयी सकारात्मक दृष्टिकोन, सर्जनशीलता आणि विकासाची जाणीव रुजविणारे असे उपक्रम महत्त्वाचे आहेत, असे मत खा. चव्हाण यांनी व्यक्त केले.

देशात परिवर्तन घडविण्यासाठी नव्या विचारांची आणि नव्या संधींची कास धरत तरुणांनी पुढे यावे. ही पिढी आपल्या कल्पकतेच्या आणि कर्तृत्वाच्या बळावर भारताला प्रगतीच्या दिशेने घेऊन जाईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. या भव्य स्पर्धेच्या आयोजनाबद्दल आ. अमरनाथ राजूरकर आणि त्यांच्या सहकाऱ्यांचेही खा. अशोकराव चव्हाण यांनी कौतुक केले. यावेळी भाजपाचे प्रभारी सुनील राणे, महापौर कविता मुळे व राज्याच्या भाजपा युवती प्रमुख शांभवी साले यांनी विचार मांडले.

# २५ वर्षांपासून फरार असलेला अपहरणाचा आरोपी अखेर जेरबंद

## नांदेड एलसीबीने अमरावतीच्या दुर्गम भागातून केली

**नांदेड (प्रतिनिधी)–** तब्बल २५ वर्षांपासून अपहरण प्रकरणात फरार असलेल्या आरोपीला स्थानिक गुन्हे शाखेने अमरावती जिल्ह्यातून जेरबंद केले आहे. आरोपी ओळख बदलून दुर्गम भागात वास्तव्यास होता.

पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या आदेशाने जिल्ह्यात फरारी व पाहिजे असलेल्या आरोपींच्या शोधासाठी विशेष मोहीम राबविण्यात येत आहे.

सन २००१ मध्ये शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गु.र.नं. १५६/२००१ कलम ३६३, ३६६(अ) भादंवि अन्वये अपहरणाचा गुन्हा दाखल होता. आरोपी प्रकाश बबनराव देवकत्ते (रा. श्रावस्तीनगर, नांदेड) हा पीडित मुलीसह गुन्हा घडल्यापासून फरार झाला होता. वारंवार ओळख लपवून तो पोलिसांना चकवा देत होता.

एलसीबीचे सपोनि गोविंद खैरे यांना आरोपी अमरावती जिल्ह्यातील




धारणी तालुक्यातील दुर्गम भागात राहत असल्याची माहिती मिळाली. माहिती मिळताच पथकाने वरिष्ठांना कळवून तलई कॅम्प, पो. दिया, ता. धारणी, जि. अमरावती येथे छापा टाकून संशयिताला ताब्यात घेतले.

चौकशीत त्याने प्रकाश बलदेवसिंह धानोपाल या खोट्या नावाने राहत असल्याचे निष्पन्न झाले. शिवाजीनगर पोलिसांशी संपर्क साधून जुन्या नोंदी तपासल्या असता तोच सन २००१ मधील फरारी आरोपी असल्याचे निश्चित झाले. आरोपी व पीडितेला पुढील कायदेशीर कारवाईसाठी शिवाजीनगर पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे. ही कामगिरी पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या आदेशाने, अपर पोलीस अधीक्षक सुरज गुरव व पोलीस निरीक्षक अतुल भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली सहा. पोलीस निरीक्षक गोविंद खैरे, पोउपनि माधव केंद्रे, अंमलदार ब्रह्मानंद लामतुरे, राजकुमार डोंगरे, विकी कालरा व महिला अंमलदार हन्नुबी शेख यांनी पार पाडली.

# तामसामध्ये घरफोडीत २ लाखांचा ऐवज लंपास, तर हिमायतनगरात ३ म्हशींची चोरी

**नांदेड (प्रतिनिधी)–** हदगाव तालुक्यातील तामसा येथे अज्ञात चोरट्यांनी घर फोडून दोन लाखांचा मुद्देमाल लंपास केला तर तिकडे हिमायतनगर ठाण्याच्या हद्दीतही जनावर चोरीची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी तामसा आणि हिमायतनगर ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**तामसा येथे घरफोडी**

दि. ९ ऑक्टोबर २०२६ रोजी पहाटे ३ वाजण्याच्या सुमारास संभाजीनगर, तामसा (ता. हदगाव) येथे अज्ञात चोरट्याने घरफोडी केली. फिर्यादी बालाजी बापुराव चंदनवार (वय ४७) यांच्या घराच्या दरवाजाचे कुलूप तोडून चोरट्याने आत प्रवेश केला व कपाटातील सोन्या-चांदीचे दागिने व रोख रक्कम असा एकूण २ लाख ४ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला.

या प्रकरणी तामसा पोलीस ठाण्यात गु.र.नं. २१२/२०२६ कलम ३३१(४), ३०५ भारतीय न्याय संहिता २०२३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून तपास सपोनि सहदेव खेडकर करत आहेत.

**हिमायतनगर येथे जनावर चोरी**

दि. ८ ऑक्टोबर २०२६ रोजी सायंकाळी ७ ते दि. ९ ऑक्टोबर रोजी सकाळी ६ वाजेच्या दरम्यान मौजे घारापूर शिवारातील आखाड्यावर (ता. हिमायतनगर) जनावर चोरीची घटना घडली.

फिर्यादी अनंतराव गणपतराव माने (वय ६२, रा. बोरी, ता. उमरखेड) यांच्या आखाड्यावर बांधलेल्या ३ म्हशी (किंमत १ लाख ६५ हजार रुपये) अज्ञात चोरट्याने चोरून नेल्या. या प्रकरणी हिमायतनगर पोलीस ठाण्यात गु.र.नं. ३०४/२०२६ कलम ३०२(२) BNS २०२३ अन्वये गुन्हा दाखल असून, तपास पोलीस हवालदार आऊलवार करत आहेत.

# अडीच हजार एकरवर लागवड होणारे दीड कोटीचे टिश्यू कल्चर केळीचे रोपटे मागणी नसल्याने फेकून दिले

## टिश्यू कल्चरचा केळी उद्योग संकटात

**अर्धापूर (प्रतिनिधी)–** कमी पर्जन्यमान, वाढलेले तापमान आणि भूगर्भातील ढासळलेली पाणीपातळी यांमुळे संपूर्ण महाराष्ट्रासह मराठवाडा दुष्काळाच्या तीव्र छायेत सापडला आहे. या दुष्काळी संकटाचा सर्वाधिक फटका कृषी आणि रोपे निर्मिती रोपवाटिका क्षेत्राला बसला असून, नांदेड जिल्ह्यातील अर्धापूर तालुक्यातील पार्डी (म.) येथील नामांकित हिरकणी रोपवाटिका टिश्यू कल्चर लॅब आज अस्तित्वाच्या लढाईत सापडली आहे.

एका सामान्य शेतकऱ्याने मेहनतीच्या बळावर उभा केलेला कोट्यवधी रुपयांचा हा उद्योग आज पाण्याअभावी आणि खरेदीदार नसल्याने पूर्णपणे कोलमडला असून, सुमारे दीड कोटी रुपयांची जी-९ टिश्यू कल्चर केळीची रोपे उघड्यावर फेकून देण्याची अत्यंत भीषण वेळ आली आहे.

नांदेड-नागपूर महामार्गावर असलेले पार्डी (म) हे गाव संपूर्ण देशात दर्जेदार केळीच्या रोपांसाठी प्रसिद्ध आहे. येथील हिरकणी रोपवाटिकेमधून दरवर्षी तब्बल ५० लाखांपेक्षा जास्त जी-९ टिश्यू कल्चर केळीच्या रोपांची निर्मिती केली जाते. महाराष्ट्रासह आंध्र प्रदेश, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश आणि गुजरात या राज्यांमधील हजारो एकर शेती या रोपांवर अवलंबून असते. परंतु यंदा संपूर्ण राज्यात पावसाचे प्रमाण घटल्याने, वाढलेले तापमान व भूजल पातळी प्रचंड खालावल्याने शेतकऱ्यांकडे सिंचनाचे कोणतेही साधन उरलेले नाही. यामुळे शेतकऱ्यांनी नवीन लागवड पूर्णपणे थांबवली असून, उभ्या असलेल्या केळीच्या बागाही पाण्याअभावी उखडून फेकून दिल्या आहेत. परिणामी, रोपवाटिकेत तयार असलेल्या कोट्यवधींच्या रोपांना कोणीही खरेदीदार उरलेला नाही. परिणामी विविध राज्यात मागणी केली जाणारी जवळपास अडीच हजार एकरवर लागवड होणारी दीड कोटी रुपयांची रोपटे मागणी अभावी फेकून देण्यात आली आहेत.

बँकांनी सक्तीची वसुली व नोटीस पाठवणे तात्काळ थांबवून काही कालावधीसाठी सवलत द्यावी. उद्योजक व्याजासह सर्व थकीत परतफेड करण्यास तयार आहेत. रोपवाटिका बंद पडल्याने बेरोजगारांच्या रांगेत आलेल्या स्थानिक कामगारांना दुष्काळ कालावधीत रोहयो (मनरेगा) अंतर्गत काम देऊन त्यांचा उदरनिर्वाह सुरू ठेवावा. राज्य सरकारने केळी संशोधन केंद्राच्या माध्यमातून या मोठ्या रोपवाटिकांना तांत्रिक व



आर्थिक पाठबळ द्यावे. तसेच कृषी उद्योगांना सावरण्यासाठी सीएसआर फंडाचा उपयोग करण्यास परवानगी द्यावी, अशी मागणी केली जात आहे.

**भविष्यात केळी उत्पादनावर मोठे संकट?**

सध्याच्या दुष्काळामुळे शेतातून केळीचे कंद नष्ट होत आहेत, तर दुसरीकडे रोपवाटिकांमधून तयार रोपे फेकून दिली जात आहेत. यामुळे आगामी काळात चांगला पाऊस झाला तरी, लागवडीसाठी केळीची गुणवत्तापूर्ण रोपे उपलब्धच होणार नाहीत. परिणामी, भविष्यात देशात केळीचे मोठे संकट आणि टंचाई निर्माण होण्याची तीव्र भीती व्यक्त केली जात आहे.

यावेळी रत्नाकर माणिकराव देशमुख रोपवाटिका चालक म्हणाले की, गेल्या १० वर्षांपासून शेकडो कामगारांचा उदरनिर्वाह चालवणारी ही प्रयोगशाळा व रोपवाटिका आता बंद पडण्याच्या उंबरठ्यावर आहे. रोपवाटिकेच्या भरभराटीच्या काळात अनेक मोठे नेते, मंत्री आणि अधिकारी येथे आवर्जून भेटी द्यायचे. मात्र, आज आम्ही भीषण अडचणीत असताना कुणीही फिरकून पाहायला तयार नाही. बँका पूर्वी कर्ज देण्यासाठी मागे लागायच्या मात्र आता सहकार्य करण्याऐवजी थेट जप्ती आणि वसुलीच्या नोटीस पाठवत असल्याची माहिती देशमुख यांनी दिली आहे.

# माहूरच्या रेणुका मंदिर परिसरातील मारहाण प्रकरण; तीन आरोपींना तीन महिने कारावासासह दंडाची शिक्षा

**नांदेड (प्रतिनिधी)–** माहूर येथील रेणुका माता मंदिर परिसरात पार्किंगच्या पैशावरून वाद घालून मारहाण करून सोन्याची पोत चोरणाऱ्या तीन आरोपींना न्यायालयाने शिक्षा सुनावली आहे.

प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी भूमीत ए. अग्रवाल यांनी आरोपी विक्रांत दिलीप भगत (रा. बौद्धपुरा, माहूर), श्रीकृष्ण सुखदेव राऊत (रा. ब्राह्मण गल्ली, माहूर) आणि अविनाश मोहन चव्हाण (रा. लखमापूर) यांना भादंवी कलम ३२३ अन्वये दोषी ठरवून प्रत्येकी तीन महिने कारावास आणि ५ हजार रुपये द्रव्यदंडाची शिक्षा ठोठावली.

दि. १७ फेब्रुवारी २०२२ रोजी दुपारी ३.४५ वाजता रेणुका मंदिर परिसरात पार्किंगचे पैसे देत नाही म्हणून आरोपींनी संगनमत करून फिर्यादी आणि त्यांच्या आई- वडिलांना शिवीगाळ करून थापड-बुक्क्यांनी मारहाण केली होती. तसेच फिर्यादीच्या आईच्या गळ्यातील चार तोळे सोन्याची पोत जबरीने चोरली होती. याप्रकरणी माहूर पोलीस ठाण्यात गु.र.नं. ११/२०२२ कलम ३९४, ३२३, ५०४, ३४ भादंवि अन्वये गुन्हा दाखल होता.

या गुन्ह्याचा तपास तत्कालीन सपोनि संजय पवार यांनी करून घटनास्थळ पंचनामा, जप्ती पंचनामा, फॉरेन्सिक तपासणी, प्रत्यक्षदर्शींचे जबाब, वैद्यकीय अहवाल यासह सखोल तपास करून वेळेत दोषारोपपत्र दाखल केले होते. हा खटला सेशन केस क्र. ४०/२०२२ अन्वये चालविण्यात आला.

पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या आदेशाने स्थापन करण्यात आलेल्या 'ट्रायल मॉनिटरिंग सेल'ने या खटल्यावर विशेष लक्ष ठेवले होते. सरकारी पक्षातर्फे सरकारी अभियोक्ता प्रसन्ना जांगडे यांनी प्रभावी युक्तिवाद केला. त्यांना कोर्ट पैरवी अधिकारी सपोनि शरद घोडके, अंमलदार धनंजय कागणे आणि नामदेव दिनकर यांनी सहकार्य केले.

# शेअर मार्केटच्या नावाखाली ६.८० लाखांची फसवणूक; वजिराबाद ठाण्यात गुन्हा दाखल

**नांदेड (प्रतिनिधी)–** शेअर मार्केटमध्ये जास्त परताव्याचे आमिष दाखवून एका व्यावसायिकाची ६ लाख ८० हजार रुपयांची फसवणूक केल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी वजिराबाद पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दि. २३ सप्टेंबर ते १ ऑक्टोबर २०२६ दरम्यान मारवाडी धर्मशाळा, वजिराबाद येथे राहणारे फिर्यादी राजेश रमेशकुमार लड्डा (वय ३६) यांना आरोपी नविशा शहा व इतर चार इसमांनी संगनमत करून व्हॉट्सॲप ग्रुपमध्ये समाविष्ट केले. वेगवेगळ्या शेअर मार्केट कंपन्यांचे शेअर्स घेऊन जास्त नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवून त्यांना वेगवेगळ्या बँक खात्यांमध्ये पैसे पाठवण्यास भाग पाडले.

विश्वास संपादन करून आरोपींनी एकूण ६ लाख ८० हजार रुपयांची फसवणूक केली. फसवणूक झाल्याचे लक्षात येताच फिर्यादींनी वजिराबाद पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार दिली. या तक्रारीवरून वजिराबाद पोलीस ठाण्यात पोलीस निरीक्षक अजित कुंभार यांच्या आदेशावरून गु.र.नं. ५११/२०२६ कलम ३१८(४), ३(५) BNS २०२३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास सपोनि चिमा बोयणे करत आहेत.

व्हॉट्सॲप, टेलिग्राम ग्रुपवर शेअर मार्केटमध्ये अवाजवी परताव्याचे आमिष दाखवून फसवणूक करणाऱ्या टोळ्या सक्रिय आहेत. नागरिकांनी अशा अनोळखी लिंक, ग्रुपवर विश्वास ठेवू नये. कोणत्याही अनोळखी खात्यात पैसे पाठवण्यापूर्वी खातरजमा करावी. फसवणूक झाल्यास तात्काळ १९३० या सायबर हेल्पलाइनवर किंवा जवळच्या पोलीस ठाण्यात संपर्क साधावा, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

# सिडको-हडको परिसरात मोकाट कुत्र्यांचा सुळसुळाट; नागरिक त्रस्त!

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** औद्योगिक वसाहत आणि उस्माननगर रोड परिसरातही मोकाट कुत्र्यांचा मोठ्या प्रमाणात वावर झाला असल्याने सकाळी मॉर्निंग वॉक करणाऱ्या नागरिकांना मोठ्या समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. प्रशासनाने तातडीने उपाययोजना करावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

शहरातील सिडको-हडको परिसरासह औद्योगिक वसाहत आणि सिडको परिसरालगत असलेल्या उस्माननगर रोडवर मोकाट कुत्र्यांचा मोठ्या प्रमाणावर वावर वाढल्याने नागरिक त्रस्त झाले आहेत. रस्त्यांवर आणि वसाहतीतील अंतर्गत मार्गांवर मोकाट कुत्र्यांचे कळप फिरताना



दिसत असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. सिडको-हडको परिसरात सकाळी कामानिमित्त घराबाहेर पडणारे नागरिक, महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांना मोकाट कुत्र्यांच्या वावरामुळे अडचणींचा सामना करावा लागत आहे. औद्योगिक वसाहतीमध्ये ये-जा करणारे कामगार आणि वाहनचालकांनाही या समस्येचा त्रास सहन करावा लागत आहे. उस्माननगर रोड परिसरातही मोकाट कुत्र्यांचा वावर नागरिकांसाठी चिंतेचा विषय बनला आहे. मोकाट कुत्र्यांचा वाढता वावर लक्षात घेता भविष्यात एखादी गंभीर घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे संबंधित प्रशासनाने या समस्येकडे गांभीर्याने लक्ष देऊन मोकाट कुत्र्यांच्या नियंत्रणासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# मानसिक आजारांकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदला; रुग्णांचे अनुभव सहानुभूतीने ऐका -डॉ. दि. भा. जोशी

**नांदेड (प्रतिनिधी)–** मानसिक आरोग्याबाबत समाजात आजही अनेक गैरसमज असून, ते दूर करण्यासाठी मानसिक आजारांचा सामना करणाऱ्या व्यक्तींचे अनुभव समजून घेणे, त्यांचे म्हणणे सहानुभूतीने ऐकणे आणि त्यांना योग्य उपचारांसाठी प्रोत्साहित करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन सुप्रसिद्ध मानसोपचारतज्ज्ञ डॉ. दि. भा. जोशी यांनी केले.

जागतिक मानसिक आरोग्य दिनानिमित्त स्वानंद व्यसनमुक्ती केंद्र व जोशी हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने जोशी हॉस्पिटल येथे सार्वजनिक जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला डॉ. आशिष तळणीकर, डॉ. प्रणद जोशी आणि डॉ.




दि. भा. जोशी यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी 'प्रत्यक्ष अनुभवांचे महत्त्व : खरी मते, खरा बदल' या विषयावर मार्गदर्शन करताना डॉ. जोशी म्हणाले की, आज जगभरात मानसिक आरोग्याबाबत जागरूकता वाढत असली, तरी या क्षेत्रात अद्याप अनेक आव्हाने आहेत. मानसिक आरोग्याच्या समस्यांचा सामना केलेल्या व्यक्तींचे अनुभव ऐकून घेणे आणि त्यांच्या भावनांना समजून घेणे, हा समाजातील सकारात्मक बदलाचा महत्त्वाचा मार्ग आहे. अशा व्यक्तींच्या व्यथा सहानुभूतीने समजून घेतल्याशिवाय मानसिक आरोग्याबाबतची सामाजिक दृष्टी बदलणार नाही.

'मानसिक आजारांच्या जखमा दिसत नाहीत; पण त्यांची वेदना तितकीच खरी असते', असे सांगत डॉ. जोशी यांनी मानसिक आरोग्याचे महत्त्व अधोरेखित केले. ते म्हणाले की, मानवी शरीराप्रमाणेच मन आणि मेंदूलाही आजार होऊ शकतात. शारीरिक आजारांची लक्षणे अनेकदा दिसून येतात; मात्र मानसिक आजारांच्या वेदना मनाच्या आत दडलेल्या असतात. त्यामुळे मानसिक त्रास सहन करणाऱ्या व्यक्तींना समजून घेणे आणि त्यांना आधार देणे गरजेचे आहे.

समाजात मानसिक आजारांविषयी आजही मोठ्या प्रमाणात गैरसमज आहेत. एखादी व्यक्ती नैराश्यात असेल किंवा तीव्र तणावाचा सामना करत असेल, तर तिला केवळ मनाची मरगळ आली आहे, असे समजणे चुकीचे आहे. नैराश्य, भीती आणि तीव्र तणाव या समस्यांकडे गांभीर्याने पाहणे आवश्यक आहे. मधुमेहासारख्या शारीरिक आजारांमध्ये जसे वैद्यकीय उपचारांची गरज असते, त्याचप्रमाणे मानसिक आरोग्याच्या समस्यांमध्येही तज्ज्ञ डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार औषधोपचार आणि समुपदेशन महत्त्वाचे ठरते, असे त्यांनी स्पष्ट केले.

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com